कर्नाटक सरकार

# मराठी सरिता

## तृतीय भाषा पाठ्यपुस्तक

## Marathi Third Language

# 10

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## TENTH STANDARD

## भाग - 1

**Karnataka Textbook Society (R.)**
6th Cross, Malleshwaram, Bengaluru - 560 003.

# ಮುನ್ನುಡಿ

2005ನೇ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮದ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ರಚಿತವಾದ ಕರ್ನಾಟಕ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯವಸ್ತುವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘವು 2010ನೇ ಸಾಲಿನಿಂದ ಒಂದನೇ ತರಗತಿಯಿಂದ ಹತ್ತನೇತರಗತಿವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ರಚನಾ ಕಾರ್ಯದಲ್ಲಿ ತೊಡಗಿದೆ. ಒಟ್ಟು ಹನ್ನೊಂದು ಭಾಷಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಹಾಗೂ ಕೋರ್ ವಿಷಯಗಳನ್ನು 7 ಮಾಧ್ಯಮಗಳಲ್ಲಿ ರಚನೆ ಮಾಡಲಾಗುತ್ತಿದೆ. 1 ರಿಂದ 4ನೇ ತರಗತಿಯವರೆಗೆ ಪರಿಸರ ವಿಜ್ಞಾನ ಮತ್ತು 5ರಿಂದ 10ನೇ ತರಗತಿಯವರೆಗೆ ಕೋರ್ ವಿಷಯಗಳಾದ ಗಣಿತ, ವಿಜ್ಞಾನ ಮತ್ತು ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ ವಿಷಯಗಳಿರುತ್ತವೆ.

**2005ರ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವು ಈ ಕೆಳಗಿನ ವೈಶಿಷ್ಟ್ಯಗಳನ್ನು ಹೊಂದಿದೆ.**

- ಕಲಿಕೆಯನ್ನು ಜೀವನದ ಅವಶ್ಯಕತೆಗಳಿಗೆ ಜೋಡಿಸುವುದು.
- ಕಂಠಪಾಠ ವಿಧಾನದಿಂದ ಕಲಿಕೆಯನ್ನು ಮುಕ್ತಗೊಳಿಸುವುದು.
- ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಹೊರತಾಗಿ ಪಠ್ಯಕ್ರಮವನ್ನು ಶ್ರೀಮಂತಗೊಳಿಸುವುದು.
- ಜ್ಞಾನದ ಅಭಿವೃದ್ಧಿಗೆ ಕಲಿಕಾ ಅನುಭವಗಳನ್ನು ಬಳಸುವುದು.
- ಭಾರತದ ಪ್ರಜಾಸತ್ತಾತ್ಮಕ ನೀತಿಯನ್ವಯ ಮಕ್ಕಳ ಅವಶ್ಯಕತೆಗಳಿಗೆ ತಕ್ಕಂತೆ ಸ್ಪಂದಿಸುವುದು.
- ಶಿಕ್ಷಣವನ್ನು ಇಂದಿನ ಹಾಗೂ ಭವಿಷ್ಯದ ಜೀವನಾವಶ್ಯಕತೆಗಳಿಗೆ ಹೊಂದುವಂತೆ ಮಾಡುವುದು.
- ವಿಷಯಗಳ ಮೇರೆಗಳನ್ನು ಮುರಿದು ಅವುಗಳ ಸಮಗ್ರದೃಷ್ಟಿಯ ಬೋಧನೆಯನ್ನು ಅಳವಡಿಸುವುದು.
- ಶಾಲೆಯ ಹೊರಗಿನ ಬದುಕಿಗೆ ಜ್ಞಾನ ಸಂಯೋಜನೆ.
- ಮಕ್ಕಳಿಂದಲೇ ಜ್ಞಾನವನ್ನು ಅಭಿವೃದ್ಧಿ ಪಡಿಸುವುದು.

**ನೂತನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕೆಳಗಿನ ಮೂಲಭೂತ ವಿಧಾನಗಳ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ರಚಿಸಲಾಗಿದೆ.**

- ಅಂತರ್ಗತ ವಿಧಾನ (Intergrated Approach),
- ರಚನಾತ್ಮಕ ವಿಧಾನ (Constructive Approach),
- ಸುರುಳಿಯಾಕಾರದ ವಿಧಾನ (Spiral Approach),

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ವಿಷಯ ಹಾಗೂ ಅಭ್ಯಾಸಗಳು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳನ್ನು ಯೋಚನೆ ಮಾಡುವಂತೆ ಮಾಡಿ, ಚಟುವಟಿಕೆಗಳ ಮೂಲಕ ಜ್ಞಾನ ಹಾಗೂ ಸಾಮರ್ಥ್ಯಗಳನ್ನು ಪಡೆಯುವಂತೆ ಮಾಡುವ ಪ್ರಯತ್ನ ಮಾಡಲಾಗಿದೆ. ಪಠ್ಯವಸ್ತುಗಳೊಂದಿಗೆ ಅತ್ಯಂತ ಅವಶ್ಯಕ ಭಾರತೀಯ ಜೀವನ ಮೌಲ್ಯಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತವಾಗಿ ಬಳಸಲಾಗಿದೆ. ಈ ನೂತನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳು ಪರೀಕ್ಷಾಪೂರಕ ದೃಷ್ಟಿಯಿಂದ ರಚಿತವಾಗಿಲ್ಲ. ಬದಲಾಗಿ ಅವುಗಳು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ಸರ್ವಾಂಗೀಣ ವ್ಯಕ್ತಿತ್ವ ವಿಕಸನಕ್ಕೆ ಪೂರಕವಾಗಿವೆ. ತನ್ಮೂಲಕ ಅವರನ್ನು ಸ್ವತಂತ್ರ ಭಾರತದ ಸ್ವಸ್ಥ ಸಮಾಜದ ಉತ್ತಮ ಪ್ರಜೆಗಳನ್ನಾಗಿ ಮಾಡುವ ಪ್ರಯತ್ನ ನಡೆದಿದೆ.

ಭಾಷಾಕಲಿಕೆಯಲ್ಲಿ ಅತ್ಯಂತ ಮುಖ್ಯ ಗುರಿಗಳಾದ ಆಲಿಸುವುದು, ಮಾತನಾಡುವುದು, ಓದುವುದು, ಬರೆಯುವುದು ಹಾಗೂ ಆಕರಗ್ರಂಥಗಳಿಂದ ವಿಷಯ ಸಂಗ್ರಹಣೆಯಂತಹ ಕ್ಷೇತ್ರವಾರು ಸಾಮರ್ಥ್ಯಗಳಿಗೆ ಒತ್ತು ನೀಡಲಾಗಿದೆ. ಈ ಕೌಶಲ್ಯಗಳೊಂದಿಗೆ ಕ್ರಿಯಾತ್ಮಕ ವ್ಯಾಕರಣ, ಸೌಂದರ್ಯಪ್ರಜ್ಞೆ, ಪ್ರಶಂಸಾ ಮನೋಭಾವ, ಮೌಲ್ಯಗಳ ಸಂವರ್ಧನೆ ಹಾಗೂ ಮಕ್ಕಳ ಅಭ್ಯಾಸ ಪುಸ್ತಕಗಳಲ್ಲಿ ಅನೇಕ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನು ಮಕ್ಕಳಿಂದ ಮಾಡಿಸಿ ಅವರಲ್ಲಿ ಸಂಬಂಧಪಟ್ಟ ಸಾಮಥ್ಯ ಸಂವರ್ಧನೆಗೆ ಅನುವು ಮಾಡಿಕೊಡಬೇಕು. ಈ ಸಾಮರ್ಥ್ಯ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಬಂದಾಗ ಅವರು ಪರೀಕ್ಷೆಗಳಿಗಾಗಿ ಕಂಠಪಾಠಕ್ಕೆ ಶರಣು ಹೋಗಬೇಕಾಗಿಲ್ಲ. ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವು ಭಾಷಾ ಕೌಶಲ್ಯಗಳ ಸಂವರ್ಧನೆಗೆ ಒಂದು ಪೂರಕವಸ್ತುವೆಂದು ಪರಿಗಣಿಸಲು, ಮಕ್ಕಳ ಮನೋವೈಶಾಲ್ಯವನ್ನು ಬೆಳೆಸಲು ವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ಅನೇಕ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕದಲ್ಲಿ ಒದಗಿಸಲಾಗಿದೆ. ಮಿತ್ರರೊಂದಿಗೆ ಗುಂಪುಗಳಲ್ಲಿ ಚರ್ಚೆಯ ಮೂಲಕ ಅವರ ಅಭಿವ್ಯಕ್ತಿ ಹಾಗೂ ಸಂವಹನ ಕೌಶಲ್ಯಗಳ ಸಂವರ್ಧನೆಯೇ ಕಲಿಕೆ ಗುರಿಯೆಂದು ಅಂತಹ ಚಟುವಟಿಕೆಗಳಿಗೆ ಹೆಚ್ಚಿನ ಪ್ರಾಮುಖ್ಯತೆಯನ್ನು ನೀಡಲಾಗಿದೆ. ಈ ರೀತಿಯ ಚಟುವಟಿಕೆಗಳು ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಕಲಿಯುವ ಕಲೆ (learning to learning) ಹಾಗೂ ಕಲಿತುದುದನ್ನು ಜೀವನದಲ್ಲಿ ಅಳವಡಿಸುವ ಶಕ್ತಿ (learning to do), ಯನ್ನು ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ವೃದ್ಧಿಮಾಡುತ್ತದೆ. ಪ್ರತಿ ಘಟಕದಲ್ಲಿಯೂ ಕೆಲವು ಜೀವನ ಮೌಲ್ಯಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತವಾಗಿ ಜೋಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಬೆಳಗಾವಿ ಹಾಗೂ ಕಲಬುರಗಿ ವಿಭಾಗದ ಸ್ಥಳೀಯರ, ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ, ಪೋಷಕರ ಆಸಕ್ತಿ ಹಾಗೂ ಅಪೇಕ್ಷೆಯ ಮೇರೆಗೆ 2023ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಸಾಲಿನಿಂದ ಮರಾಠಿ ಭಾಷೆಯನ್ನು ತೃತೀಯ

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

ಭಾಷೆಯಾಗಿ ಕಲಿಸುವ ಉದ್ದೇಶದಿಂದ 10ನೇ ತರಗತಿ ಮರಾಠಿ–ಸರಿತ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವನ್ನು ನೂತನವಾಗಿ ರಚಿಸಿ ಮುದ್ರಿಸಲಾಗಿದೆ. ಇದರ ಸಂಪೂರ್ಣ ಪ್ರಯೋಜನವನ್ನು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಹಾಗೂ ಭಾಷಾಸಕ್ತರು ಪಡೆಯುವರೆಂಬ ವಿಶ್ವಾಸವನ್ನು ಸಂಘವು ಹೊಂದಿದೆ.

ಈ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕದ ರಚನೆಯಲ್ಲಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸಮಿತಿಯ ಅಧ್ಯಕ್ಷರಿಗೆ, ಸದಸ್ಯರಿಗೆ, ಕಲಾವಿದರಿಗೆ, ಪರಿಶೀಲಕರಿಗೆ, ಸಂಪಾದಕ ಮಂಡಳಿಯ ಸದಸ್ಯರುಗಳಿಗೆ ಮತ್ತು ಜಿಲ್ಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಸಂಸ್ಥೆ, ಬೆಳಗಾವಿರವರಿಗೆ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘವು ಹೃತ್ಪೂರ್ವಕ ಕೃತಜ್ಞತೆಗಳನ್ನು ಸಲ್ಲಿಸುತ್ತದೆ. ಈ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವನ್ನು ಇನ್ನಷ್ಟು ಉತ್ತಮಗೊಳಿಸುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ರಚನಾತ್ಮಕ ಸಲಹೆಗಳನ್ನು ಸಂಘವು ಹೃತ್ಪೂರ್ವಕವಾಗಿ ಸ್ವಾಗತಿಸುತ್ತದೆ.

**ಶ್ರೀ ಎಂ.ಪಿ. ಮಾದೇಗೌಡ**
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ.)
ಬೆಂಗಳೂರು.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# Foreword

In the pursuit of fostering a healthier and more balanced educational journey, we present this initiative aimed at reducing the weight of school bags. Education is the cornerstone of progress and it is our responsibility to ensure that the pursuit of knowledge is accompanied by the wellbeing of students.

As a first step, to reduce the burden of heavy bags, the School Education Department, Government of Karnataka has decided to print semester-wise textbooks in 2 parts i.e., Summative Assessment 1 and 2. This intervention will help significantly in reducing the weight of school bags.

This Endeavour signifies a paradigm shift, acknowledging the strain posed by bulky bags on students.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**Manjushree. N. IAS**
Managing Director
Karnataka Textbook Society (R.)

# संपादकीय

इयत्ता दहावीचे मराठी तृतीय भाषा पाठ्यपुस्तक तयार करीत असताना एन. सी. ई. आर. टी. आणि एन.सी.एफ. 2005 ची शैक्षणिक ध्येय धोरणे व उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून मराठी सरिता हे पाठ्यपुस्तक तयार केले आहे. जे आपल्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. यातील साहित्य निवडताना भाषेच्या श्रवण, वाचन, लेखन आणि संभाषण या भाषिक कौशल्यांबरोबरच विद्यार्थ्यांच्या साहित्यिक अभिरुचीचाही विचार केला आहे. त्यांच्या संस्कारशील मनाचा योग्य तो विकास व्हावा यासाठी संत साहित्य, बखर वाड्मय, नव साहित्य, वैज्ञानिक कथा, राष्ट्रभक्ती जागृत करणारे साहित्य, असे विविध स्वरूपी साहित्य निवडले असून ऐतिहासिक पत्र, लघुकथा, ललित लेख,चरित्रपर लेख, प्रबोधकथा, व्यक्ती चरित्रात्मक लेख, असे गद्य लेखन तर अभंग, भारुड, दलित काव्य, श्लोक, मुक्तछंदात्मक कविता, ग्रामीण गीत, स्फूर्ती गीत, अशा वेगवेगळ्या काव्यप्रकारांचा समावेश यात केला आहे.

भाषेचा आणि त्यातील लेखनाचा काळानुसार होत जाणारा विकास लक्षात घेऊन त्याचे बदलते स्वरूप विद्यार्थ्यांना समजावे अशा पद्धतीने गद्य पद्य हा क्रम ठेवला आहे.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडवण्यासाठी, त्यांच्यावर मूल्य संस्कार करण्यासाठी, देशभक्ती, सत्य, दया, सहानुभूती, पर्यावरण रक्षण, कलासक्त वृत्ती, यांचा विकास करण्याच्या दृष्टीने यातील गद्यपद्याची निवड केली आहे. पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीसाठी संपादक मंडळ सदस्य, राणी चन्नम्मा विद्यापीठातील डॉ. विनोद गायकवाड सर, डॉ. मनीषा नेसकर मॅडम, सहनिर्देशक श्री. सकऱ्याप्पागौड बिरादर कार्यदर्शी परीक्षा मंडळी बेळगावी विभाग, प्राचार्य श्री. बसवराज नालतवाड, डायट, मन्नूर, बेळगावी. वरिष्ठ प्राध्यापक श्री. आर. के. अंजनेय समन्वय अधिकारी प्रा. सौ.भारती दासोग. डायट मण्णूर, बेळगावी. या सर्वांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले त्यांचे मनःपूर्वक आभार.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**संपादक**

# TEXT BOOK COMMITTEE

*Chairman :* Smt.Dr. Sandhya V. Deshapande Retd. Professor,
Dept. of Marathi, R.P.D College Belagavi.

*Members :*
Shri Shashikant B.Gurav Retd Asst. Teacher,
Sanmati Vidyamandir Siddanal, Tal - Nippani, Dist- Belagavi.
Shri Madhukar Maruti Lohar Retd. Asst. Teacher,
The Valkart Academy, Gokak Falls, Gokak Tal - Gokak, Dist- Belagavi.
Shri Santoshkumar Rajaram Mane Head Master,
Govt. High School Kot, Tal - Hukkeri, Dist- Belagavi.
Shri Yuvraj Kallapa Patil Asst. Teacher,
Smt. Leelavati Venkatesh Karguppikar High School, Agasage, Tal- Belagavi.

*Scrutinizer :*
Smt. Shailaja Babasaheb Patil Asst. Teacher,
Mallikarjun Vidyalay Kagwad Tal – Kagwad, Dist- Belagavi.

*Artist :*
Shri Dnyaneshwar Motappa Mirashi Drawing Teacher,
Karanataka public high School Katkol Tal : Ramdurg Dist- Belagavi

*Editorial Board Members :*
Dr. Manisha Nesarkar Professor,
Dept. of Marathi Section, R.C.U. Belagavi.
Dr. Vinod Gaikwad Retd. Professor,
Marathi Section, R.C.U. Belagavi.

*Co-ordination :*
Shri Basavaraj M. Nalatawad Principal/DDPI (Dev),
DIET, Mannur, Belagavi.
Smt. Bharati Bheemarayappa Dasog Lecturer,
DIET, Belagavi

*Chief Advisors :*
Sri M. P. Madegowda,
Managing Director, Karnataka Textbook Society (R.) Bengaluru.
Smt M. D. Usha,
Deputy Director, Karnataka Textbook Society (R.), Bengaluru.

*Programme Co-ordinator :*
Sri L. Shankare Gowda
Assistant Director, Karnataka Textbook Society (R.), Bengaluru.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# अनुक्रमणिका

## भाग : 1

D9Q1E6

### गद्य विभाग


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक / लेखिका | साहित्य प्रकार | मूल्य | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | आज्ञापत्र | रामचंद्रपंत अमात्य | ऐतिहासिक पत्र | वृक्षसंवर्धन | 1 |
| 2. | तारा आणि जंतू | वि. स. खांडेकर | लघुकथा | विज्ञाननिष्ठा | 6 |
| 3. | सतीचे शस्त्र | श्री. म. माटे | कथा | धैर्य, आत्मविश्वास | 14 |
| 4. | रसराज – जसराज | रामकृष्ण बाक्रे | ललित लेख | कलाप्रेम | 23 |
| 5. | सीड मदर – राहीबाई पोपेरे | संपादित | चरित्रपर लेख | परंपरासंवर्धन | 32 |


### पद्य विभाग


| अ. क्र. | कवितेचे नाव | कवी / कवयित्री | साहित्य प्रकार | मूल्य | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | साधूची आत्यंतिक समता | संत ज्ञानेश्वर | अभंग | समभाव | 42 |
| 2. | दादला नलगे बाई | संत एकनाथ | भारुड | ईश्वरनिष्ठा | 48 |
| 3. | मनाचे श्लोक | संत रामदास | श्लोक | नीती, उपदेश | 52 |
| 4. | निर्झरास | बालकवी | निसर्ग कविता | निसर्गप्रेम | 56 |
| 5. | थरकू नको | नारायण सुर्वे | दलित काव्य | सामाजिक भान | 60 |
| | व्याकरण – विभक्ती, अलंकार, शब्दसमूहाबद्दल एक शब्द. | | | | 64 |
| | पूरकवाचन – 1) गर्वाचा परिणाम | | | | 75 |
| | 2) अभंग | | | | 75 |
| | 3) खडीसाखरेचा खडा | | | | 76 |


NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# 1. छत्रपती शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र

G8V8K5

**परिचय :** रामचंद्रपंत नीलकंठ अमात्य (जन्म 1650 – मृत्यू 1733) हे शिवकालीन मुत्सद्दी लेखक होत. त्यांचे वडील नीलकंठ उर्फ निळो सोनदेव अमात्य, हे 1647 च्या सुमारास शिवाजी महाराजांचे अमात्य झाले. त्यानंतर त्यांचे चिरंजीव रामचंद्रपंतांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे, राजाराम महाराज यांच्या कारकिर्दीत अमात्य म्हणून उत्तम प्रकारे कारभार सांभाळला. ते अनुभवी व निस्वार्थी होते, त्यांची दृष्टी सखोल व बारकाईची होती. त्यांना 'हुकूमतपन्हा' हा किताब मिळाला होता.

प्रस्तुत उतारा श्री. प्र. न. जोशी यांनी संपादित केलेल्या 'आज्ञापत्र' या पुस्तकातून संक्षिप्त करून घेतला आहे. या उताऱ्यामध्ये गडकिल्यांबरोबरच वृक्षसंवर्धन कसे करावे या संदर्भात विवेचन केले आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य – वृक्षसंवर्धन)



गडास येण्याजाण्याचे मार्ग आसतील ते सुगम नसावे. सुगम आसले तरी ते मोडून, त्यावरील झाडी वाढऊन, आणखीकडे परके फौजेस येतां कठीण यैसे मार्ग घालावे. याविरहित बलकुबलीस चोरवाटा ठेवाव्या. त्या सार्वकाल चालों देऊं नयेत. समयास तेच दिंडी आथवा दरवाजा याचा राबता करून सामान सर्वदा नेत जावें. गडाची राखण म्हणजे कमरग्याची झाडी, ते झाडी प्रयत्नें वाढवावी.

त्यामध्ये येक काठी तेही तोडूं न द्यावी. बलकुबलीस त्या झाडीमध्यें हषम बंदुकी घालावयाकारणें जागे आसो द्यावे. गडा-सभोंवती नेहमी मेटें आसावी. घेरियाची गस्त करीत जावी. गस्तीचा जाब मेटकरी यांणी देत जावा. गडाखालतें इमारतीचे घर किंवा घरा- भोवते दगडाचे कुसू सर्वथैव आसों न द्यावें.गडावरील झाडें जीं आसतील ती राखावी. याविरहित झाडे आंबे, फणस, चिंचा, वड, पिंपल आदिकरून थोर वृक्ष व निंबे, नारिंगे आदिकरून लाहन वृक्ष, तैसेच पुष्पवृक्ष, वल्ली, किंबहुना प्रयोजक - अप्रयोजक जें झाड होत आसेल तें गडावरी लावावें, जतन करावें, समई तितकेंही लांकडे तरी प्रयोजनास पडतील, आरमारास तख्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदिकरून थोर लाकूड आसावे लागते. ते आपले राज्यांत आरण्यामध्यें सागवानादि वृक्ष आहेत त्यांचे जे आनकूल पडेल ते हुजूर लेहून हुजूरचे परवानगीने तोडून न्यावे, याविरहित जें लागेल तें परमुलकीहून खरेदी करून आणवीत जावें. स्वराज्यातील आंबे, फणस आदिकरून हेही लाकडे आरमारचे प्रयोजनाचीच. परंतु त्यांस हात लाऊ न द्यावा. काये म्हणोन कीं, हीं झाडें वर्षा दों वर्षानी होतात यैसें नाहीं. रयतेने हीं झाडें लाऊन लेकरासारखी बहुत काल जतन करून वाढविलीं असता, ती झाडें तोडिलियावरी त्यांचे दुःखास पारावार काये आहे? येकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल, तें कार्य करणारासहित स्वल्पकालेंच बुडोन नाहींसेच होतें. किंबहुना धण्याचेच पदरीं प्रज्यापीडणाचा दोष पडतो. या वृक्षाच्या अभावें हानीही होते. या- करितां हे गोष्ट सर्वथा होऊं न द्यावी. कदाचित येखादे झाड, जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेले आसेल तर त्याचे धण्यास राजी करून, द्रव्य देऊन, त्याच्या संतोषें तोडून न्यावे. बलात्कार रयतेवरी सर्वथा न करावा.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**शब्दार्थ :** अमात्य - मंत्री, मुजुमदार. सचिव - वजीर. मुत्सद्दी - धूर्त, धोरणी, धुरंदर राजकारणी. आज्ञापत्र - शासनपत्र, लेखी हुकूम, सरकारी हुकूमचे पत्र. सुगम - सोपे. परके - अनोळखी. विरहित - शिवाय. दिंडी दरवाजा - मोठ्या दरवाज्यात असणारा लहान दरवाजा ज्यातून एखादा माणूस सहजपणे ये - जा करू शकेल. राबता करून - वापर करून, उपयोग करून. हषम - पायदळ. मेटे - चौक्या, पहारे. मेटेकरी - चौकीदार, पहारेदार. गस्त - पहारा. सर्वथैव - सर्वत: (येथे याचा अर्थ मुळीच किंवा अजिबात असा घ्यावा), कुसू - कुंपण. प्रयोजक - उपयुक्त, आवश्यक. अप्रयोजक - उपयुक्त नसलेला.

आरमार - सागरसेना, नौकादळ. हुजूर - महाराज. लेकरू - मुल. दुःखास पारावार नसणे - अतिशय दुःख होणे. पारावार - मीती. धन्याचे - मालकाचे. प्रजापीडणाचा - प्रजेस त्रास दिल्याचा. बलकुबलीस - अडचणीच्या वेळी उपयोगासाठी, मदतीसाठी.

**आज्ञापत्राचा सरळ अर्थ :** या पत्रात शिवाजी महाराजांनी गडाची राखण करणाऱ्या गडकऱ्यास गडावरील मार्ग झाडे-झुडपे चोरवाटा या सर्वांची राखण कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले आहे. यावरून महाराजांचे वृक्षप्रेम त्यांची राजनीती रयतेवरील त्यांचे प्रेम इत्यादी गोष्टी दिसून येतात.

गडावरील येण्याजाण्याचे मार्ग सुगम नसावेत. ते ओबडधोबड असावेत. ते सपाट व्यवस्थित असले तरी मोडून त्यावर झाडी वाढवून परकीयांच्या शत्रूच्या सैन्यास गडावर प्रवेश करण्यास कठीण होतील असे करावेत. गडावर चोर वाटा ठेवाव्यात पण त्याचा उपयोग रोजच्या वापरात करू नये. गडावरील झाडी हे गडाचे राखण करण्याचे मुख्य साधन आहे. ती इतकी घनदाट करावी की कोणास एक काडीही तोडू देऊ नये. अडचणीच्या वेळी त्या झाडीतून पायदळ बंदुकी घेऊन जाईल इतकी पायवाट असावी. गडाभोवती चौक्या असाव्यात. त्यावर गस्त घालणारे पहारेकरी असावेत. गस्त घालणाऱ्यांकडून गडकऱ्यांनी गस्तीची माहिती घ्यावी. गडाखाली इमारतीचे घर अथवा घराभोवती दगडांचे कुंपण कधीच असू नये. गडावरील सर्व झाडांची राखण करावी.

याशिवाय आंबे, फणस, चिंच, वड, पिंपळ असे मोठे वृक्ष व निंब, नारंगी असे लहान वृक्ष तसेच फुलझाडे, लता, वेली किंबहुना उपयुक्त व निरुपयोगी असे जे जमेल ते झाड गडावर लावावे, राखण करावी. गडावर राहणाऱ्या जनतेला त्या झाडांची लाकडे वापरता येतील असे महाराज सांगत असायचे.

आरमार म्हणजे नौकादळ. नौकादळ उभारण्यासाठी सोट, डोलाच्या काठ्या, तरूते अशा प्रकारचे खूप लाकूड लागते. आपल्या राज्यात जी अरण्ये आहेत, त्यात सागवानाचे वगैरे वृक्ष आहेत, त्यातून जे आवश्यक वाटेल ते मालकाच्या परवानगीने तोडून घ्यावे याशिवाय, जे लागेल, ते दुसऱ्या प्रांतातूनही घ्यावे पण, ते खरेदी करून घ्यावे. आपल्या राज्यातील आंबे, फणस वगैरे लाकडेही आरमारास लागतातच पण त्यास हात लावू नये. ती तोडू नयेत कारण, ही झाडे वर्षा - दोन वर्षात वाढणारी झाडे नाहीत. लोकांनी ह्या झाडांची फळे आपल्या

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

मुला – बाळांना खाण्यासाठी खूप वर्षे जतन करून वाढवलेली असतात. अशी झाडे तोडली तर लोकांना अत्यंत दुःख होते. एखाद्यास दुःख देऊन जे काम केले जाते, ते अल्पावधीतच नष्ट होते, याचा दोष मात्र मालकास लागतो. शिवाय अशा वृक्षांच्या अभावाने खूप हानी होते, म्हणून अशी गोष्ट घडू देऊ नये. एखादे झाड खूपच जीर्ण झाले असेल, कामातूनच गेले असेल, तरी त्या झाडाच्या मालकास विचारून त्यास पैसे देऊन न्यायाने ते झाड तोडून न्यावे. अन्याय अत्याचाराने झाड तोडले जाऊ नये. अशा शब्दात महाराज आपल्या गडकऱ्यास मार्गदर्शन करतात. यात रोखठोकपणा आहे, धाक आहे. स्वराज्यातील वृक्षांविषयी काळजी व चिंतन आहे.

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) गडावरील सुगम मार्ग ओबडधोबड का करावेत असे महाराज म्हणतात?
2) गडाची राखण करण्याचे मुख्य साधन कोणते?
3) निरुपयोगी झाडांचाही कोणता उपयोग होतो असे महाराज सांगतात?
4) आरमार करण्यासाठी कोणती झाडे लागतात?
5) दुसऱ्या प्रांतातून झाडे आणावयाची झाल्यास कशी आणावी?
6) चोरवाटांचा वापर कशासाठी करू नये?

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) जीर्ण होऊन कामातून गेलेल्या झाडांचे काय करावे असे महाराज सांगतात?
2) गडावरील झाडांचा उपयोग कशासाठी करावा असे महाराज सांगतात?
3) गडावरील चोरवाटांचा उपयोग कशासाठी केला जात असे?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा.**

1) आपल्या राज्यातील आंब्या, फणसाची झाडे तोडू नयेत असे लेखक का म्हणतो?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

2) गडावरील झाडांचे महत्व लेखकांनी कसे वर्णिले आहे?

3) रयतेविषयी महाराजांचे प्रेम यावर टीप लिहा?

**प्रश्न 4. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा ओळीत लिहा.**

1) महाराजांच्या व्यक्तीत्वाचे कोणते गुण पुढील उताऱ्यात दिसतात ते सांगा?

2) छत्रपती शिवाजी महाराजांनी या उताऱ्यातून गडाची राखण करणाऱ्यांना कोणता उपदेश केला आहे?

❖ **भाषाभ्यास :**

**पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

राजी करणे, दु:खास पारावार नसणे, सुगम असणे, राबता करणे, जीर्ण होणे.

❖ **उपक्रम :**

1) छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध किल्ल्यांची यादी करा.

2) छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक पत्रे मिळवून वाचा.

3) आज्ञापत्र' हा ग्रंथ मिळवून त्यातील विविध पत्रे पहा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



हा शिवनेरी किल्ला आहे, छत्रपती शिवरायांच्या जीवनातील येथे घडलेल्या प्रसंगाची माहिती मिळवा.

✲✲✲✲

# 2. तारा आणि जंतू

T5H3A1

**परिचय :** **विष्णू सखाराम खांडेकर हे (जन्म 1898 – मृत्यू 1976)** प्रतिभावंत, ध्येयवादी, जीवनवादी लेखक होते. त्यांचे 'सांजवात', 'सूर्यकमळे', 'प्रातः काल' हे लघुकथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'दोन ध्रुव', 'उल्का', 'क्रौंचवध', 'कांचनमृग' या गाजलेल्या कादंबऱ्या आहेत. 'चांदण्यात', 'सायंकाळ', 'वायुलहरी', 'मंजिऱ्या' हे लघुनिबंध संग्रह प्रसिद्ध आहेत. तसेच मराठीचा नाट्यसंसार, वनभोजन, गडकरी : व्यक्ती आणि वाङ्मय असे इतर लेखनही त्यांनी केले आहे. त्याग, ध्येयवाद, लोकशिक्षण, लोकरंजन ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये. 'साहित्यकार जीवनाचा भाष्यकार असतो' या सुवचनाची प्रचीती त्यांच्या कादंबऱ्या वाचताना येते. त्यांच्या 'ययाती' या कादंबरीला 1974 साली ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले आहे.

(मूल्य –विज्ञाननिष्ठा)

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

ते दोघे मित्र लहानपणीच आपल्या खेड्यातून बाहेर जायला निघाले. वृद्ध गावकऱ्यांनी त्यांना उपदेश केला, ''पोरांनो, आपलं गाव सोडून बाहेर कशाला जाताय? अरे, याच गावात तुमचे आजे, पणजे, खापरपणजे जन्माला आले. लहानाचे मोठे झाले. देवाघरी गेले. देवानं त्यांना कधी काही कमी पडू दिलं का? अरे देवदत्ता, बाबा भगदत्ता, तुम्हां दोघांना वेडबिड तर नाही ना लागलं? खुशाल इथं राहा. परमेश्वर देईल ती मीठ-भाकर खा.''

एका प्रमुख वृद्धाला उद्देशून देवदत्त म्हणाला, ''नाही आजोबा, मी नाही इथं राहणार. नदी डोंगर सोडून दूर दूर जाते, म्हणून ती समुद्रापर्यंत पोहोचते. मीही तसाच दूर दूर फिरत जाणार आहे. या गावात कुणालाही ठाऊक नसलेली एखादी विद्या शिकून येणार आहे.''

म्हातारेबुवा रागावले. ते भगदत्ताकडे वळून म्हणाले, ''नि तू रे पोरट्या? तू कसला दिग्विजय करणार आहेस? मिऱ्याएवढी झाली नाहीत पोरं नि चालली मेरूमंदाराला मिठ्या मारायला!''

भगदत्त नम्रपणे उत्तरला, ''आजोबा, मीही एखादी नवी विद्या शिकून येणार आहे. सर्वांच्या उपयोगी पडेल अशी.''

ते दोघे मित्र काही काळ बरोबर फिरत राहिले. त्यांनी शहरे पाहिली, खेडी पाहिली, उद्याने पाहिली.

मग एके दिवशी देवदत्त भगदत्ताला म्हणाला, 'हल्ली रोज रात्री मला एक स्वप्न पडतं. त्या स्वप्नात मी हिमालयाच्या एका शिखरावर उभा आहे, आणि हातानं आकाशातली एकेक चांदणी खुडीत आहे, असं मला दिसतं.' भगदत्त म्हणाला, 'तुझ्यासारखं मलाही रोज रात्री एक स्वप्न पडतं. मी खूप लहान झालो आहे, एक सूक्ष्म किटक झालो आहे, अस्फुट कळीच्या आत शिरून लपंडाव खेळत आहे, पाण्याच्या एका थेंबात दडून बसलो आहे, असं काही तरी मला स्वप्नात दिसतं.'

दोघांनी आपापल्या स्वप्नाचा अर्थ लावण्याचा खूप प्रयत्न केला, पण काही केल्या त्यांना त्या स्वप्नांचा अर्थ कळेना. शेवटी देवदत्त अभिमानाने म्हणाला, ''माझं स्वप्न भव्य आणि सुंदर आहे. तुझं क्षुद्र आणि कुरूप आहे. आपण मित्र असलो तरी ! आपले मार्ग भिन्न आहेत, हे या स्वप्नांवरून उघड होत आहे.''

भगदत्त काहीच बोलला नाही.

दुसऱ्या दिवशी ते दोघे मित्र आपापल्या स्वप्नांच्या मागून भिन्न भिन्न मार्गांनी चालू लागले. मात्र एकमेकांचा निरोप घेताना जी विद्या मिळेल तिचा आपल्या गावाच्या सेवेसाठी उपयोग करायचा, अशी दोघांनी शपथ घेतली.

बारा वर्षांनी त्या दोघा मित्रांची पुन्हा भेट झाली. दोघांनाही या अकल्पित पुनर्भेटीचा अत्यंत आनंद झाला. त्या आनंदावर अद्भूताचा कळसही चढला. अगदी निरनिराळ्या वाटांनी ते दोघे परत आपल्या गावी आले होते. पण एकाच दिवशी, एकाच वेळी !

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



आपण कोणती विद्या शिकून आलो आहोत हे देवदत्ताने सांगितले. तो एक यंत्र बरोबर घेऊन आला होता. त्या यंत्रातून रात्री आभाळाकडे पाहिले की आकाशातल्या चांदण्या खूप मोठ्या दिसू लागत. अगदी जवळ आल्यासारख्या भासत. निळ्या पारिजातकाच्या पांढऱ्या शुभ्र फुलांचा सडा पडत आहे आणि त्यातली काही फुले आपल्यावर उधळीत जात आहेत, असा त्या यंत्रातून पाहणाऱ्याला भास होईल. सारे गाव देवदत्ताचे कौतुक करू लागले. देवदत्ताने स्वर्ग पृथ्वीवर आणला असे म्हणू लागले.

रोज रात्री देवदत्त लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना आपल्या यंत्राच्या सहाय्याने लखलखणाऱ्या तारामंडळात नेऊन सोडी. सारे गाव त्याच्यावर खूष झाले. देवदत्ताने गावाचे नाव मोठे केले, असे जो तो म्हणू लागला.

एका म्हाताऱ्याने भगदत्ताला विचारले, 'तू काही विद्या घेऊन आलायस की नाही? की गेलास तसाच हात हलवीत परत आलास?'

भगदत्त नम्रपणे म्हणाला, 'मीही एक शास्त्र शिकून आलो आहे. पण माझ्या विद्येत देवदत्तासारखं भव्य, दिव्य काही नाही. माझ्यापाशीही एक यंत्र आहे. त्यातून पाहिलं की डोळ्यांना न दिसणारे बारीक बारीक जंतू दिसू लागतात.'

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS



सारी मंडळी हे ऐकून खो खो हसू लागली. एक म्हातारेबुवा म्हणाले, ''घाणेरडे किडे आणि जंतू एरवी काय थोडे बघतो आम्ही? ते मुद्दाम यंत्रातून बघायला जायचं ? देवदत्त आम्हाला स्वर्गात नेतो, पण तुझ्याबरोबर या नरकात यायला कोण तयार होणार बाबा? देवदत्तासारखं तूही गावाचं नाव मोठं करशील असं आम्हांला वाटत होतं. पण तुझ्यासारख्या वेड्याला ते कसं जमणार? हिरा तो हिरा नि गारगोटी ती गारगोटी!''

भगदत्त गप्प बसला.

काही महिने लोटले. पावसाळा सुरू झाला. गावात माणसे पटापटा आजारी पडू लागली. काही कारण नसताना त्यांना अकस्मात वांत्या होऊ लागल्या. काही केल्या त्या थांबत नसत. गावातल्या पिढीजात वैद्यांनी या आजारी मंडळींना चूर्ण दिली, आसवे पाजली, आरिष्टे चाखवली. पण कुणालाही गुण येईना, सारा गाव भयभीत होऊन गेला.

देवदत्तसुद्धा या विकाराने आजारी पडला. हळूहळू तो इतका गळून गेला की, आता आपण या दुखण्यातून उठतो की नाही, अशी भीती त्याला वाटू लागली.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

सारं गाव ज्या तळ्याचे पाणी पीत होते, तेच दूषित झाले असावे असा भगदत्ताला संशय आला. त्याने ते पाणी आपल्या यंत्राच्या सहाय्याने तपासले. त्या पाण्यातले डोळ्यांना न दिसणारे सूक्ष्म जंतूचे विचित्र जग त्याने आबालवृद्धांना दाखविले. पाणी उकळून शुद्ध करून पिण्याचा सल्ला त्याने गावाला दिला..

आजाराला कंटाळलेल्या सर्व लोकांनी तो मुकाट्याने ऐकला. रोगाने गावातून पळ काढला.

आता जो तो भगदत्ताची स्तुती करू लागला. देवदत्त मागे पडला. त्याचे यंत्र म्हणजे नुसती करमणूक होती असे म्हणून अनेक लोक त्याची निंदा करू लागले.

बरे वाटू लागल्यावर स्वतः देवदत्त एके दिवशी भगदत्ताला भेटायला आला. तो त्याला म्हणाला, ''मित्रा, मी तुझ्यापेक्षा फार मोठी विद्या कमावली आहे असा मला उगीचच गर्व झाला होता. माझ्या हातून तुझा कळत न कळत अपमान झाला असला तर त्याबद्दल मला क्षमा कर. पण खरं सांगतो, तुझी विद्या माझ्यापेक्षा फार श्रेष्ठ आहे. तू नसतास तर माझे प्राण काही वाचले नसते''.

भगदत्त नम्रपणाने त्याला म्हणाला, ''मित्रा, असं काही बोलू नकोस. तुझी विद्या फार फार श्रेष्ठ आहे. तिनं मला केवढा धीर दिला आहे याची तुला कल्पना नाही.''

देवदत्त आश्चर्याने भगदत्ताकडे पाहू लागला.

भगदत्त पुढे बोलू लागला, 'मित्रा, विद्या शिकताना पावलोपावली क्षुद्र जंतूंशी आणि मलीन कीटकांशी माझा संबंध येत होता. मी शास्त्र शिकलो. पण कुरुप, ओंगळ कीटकांच्या सतत सहवासानं आणि जंतूंच्या दर्शनाने माझी मनः स्थिती मोठी विचित्र झाली होती. सारं जग मला ओंगळ वाटू लागलं होतं. जंतूंच्या भक्ष्यस्थानी पडण्याकरिता परमेश्वराने मनुष्याला निर्माण तरी कशाला केलं असं मला वाटू लागलं होतं. माझ्या ज्ञानामुळं भव्यतेवरला आणि दिव्यत्वावरला माझा सारा विश्वास उडाला होता. पण इथं परत आल्यावर मी तुझ्या यंत्राच्या

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

मदतीनं आकाशातल्या चांदण्यांशी गुजगोष्टी करू लागलो. मग माझा तो विश्वास पुन्हा जागृत झाला. हे जीवन जसं ओंगळ जंतूंच आहे. तसंच त्या सुंदर चांदण्यांचही आहे. मला हे तुझ्यामुळं कळलं.'

**शब्दार्थ:** मेरु - मंदार, पर्वतांची नावे. मिरी - मसाल्यातील एक लहान पदार्थ. उद्यान - बाग. क्षूद्र - हलका ,कमी प्रतिचा. कुरूप - ओंगळ, घाणेरडे. भिन्न - वेगळे. अकल्पित - अचानक, कल्पना न केलेले. चूर्ण - भुकटी, पूड. आसव - अर्क, काढा. करमणूक - मनोरंजन. मलीन - मळका, घाणेरडा. मेरुमंदारास मिठ्या मारणे - अशक्य ते शक्य करण्याचा प्रयत्न करणे.

**टिपा :** 1) "**हिरा तो हिराच आणि गारगोटी ती गारगोटीच**" - हिरा चमकतो, गारगोटी निष्प्रभ असते. तिच्यात चमकदारपणा नसतो. हिरा मौल्यवान असतो तर गारगोटीला काहीच किंमत नसते. या पाठात हिरा हा शब्द हुशार, बुद्धिमान या अर्थाने तर गारगोटी हा शब्द वेडा, निर्बुद्ध या अर्थाने वापरला आहे. म्हणून याचा अर्थ बुद्धिमान माणूस व वेडा माणूस यांची बरोबरी होऊ शकत नाही.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) दोन मित्रांची नावे काय होती?
2) देवदत्त कशासाठी गाव सोडून निघाला होता?
3) दोघांनी निरोप घेताना कोणती शपथ घेतली?
4) पुन्हा त्या दोघांची भेट किती वर्षांनी झाली?
5) देवदत्तचे यंत्र पाहून लोक काय म्हणू लागले?

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) भगदत्तला म्हातारे बुवा रागात काय म्हणाले?
2) देवदत्तला कोणते स्वप्न पडत असे?
3) देवदत्तला गर्व का झाला?

4) पावसाळा सुरू झाल्यावर काय घडले?

5) देवदत्त आणि भगदत्त यांच्या स्वप्नांचा परिणाम काय झाला?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा.**

1) प्रमुख वृद्धाला उद्देशून देवदत्त काय म्हणाला?

2) भगदत्तला कोणते स्वप्न पडत असे?

3) देवदत्त आपल्या स्वप्नाबद्दल अभिमानाने काय म्हणाला?

4) बारा वर्षांनी परतल्यानंतर गावकऱ्यांनी देवदत्त आणि भगदत्त यांची तुलना कशी केली?

5) देवदत्त गळून का गेला? त्याला कोणती भीती वाटू लागली?

**प्रश्न 4. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा ओळीत लिहा.**

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

1) गाव सोडून बाहेर पडणाऱ्या पोरांना गावातील वृद्धांनी कोणता सल्ला दिला?

2) देवदत्त भगदत्त यांना कोणते स्वप्न पडत होते?

3) सारे गाव देवदत्त च्या विद्येबद्दल कौतुक का करत होते?

4) भगदत्तने लोकांना काय दाखवले? ते बघून म्हातार बुवा काय म्हणाले?

5) आजारपणाबद्दल भगदत्तला कोणता संशय आला? त्याने काय केले?

6) दोघातील श्रेष्ठ विद्या कोणाची ? देवदत्तचे गर्वहरण कसे झाले?

7) भगदत्तने देवदत्तच्या विद्येचा गौरव कसा केला?

❖ **भाषाभ्यास :**

**खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

दिग्विजय करणे, भयभीत होणे, मेरुमंदारास मिठ्या मारणे.

**खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

शूद्र, कुरूप, मित्र, स्वर्ग, स्तुती, अपमान, जागृत, भिन्न

**खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

पावलोपावली, दिग्विजय.

**पुढील शब्दांचा विग्रह करून संधीचे नाव लिहा.**

दिग्विजय, हिमालय, पुनर्भेट, मन:स्थिती.

❖ **उपक्रम :**

1) मी कोण होणार (माझे स्वप्न) या विषयावर पंधरा ते वीस ओळीचे मनोगत लिहा.

2) तुमच्या परिसरातील एखाद्या आकाशाची माहिती देणाऱ्या आकाश संशोधन केंद्राला भेट देऊन सविस्तर माहिती मिळवा.

3) 'बेळगावातील गणेशपूर येथे तारांगण' या नावाने आकाशाची माहिती देणारी संस्था असून आपण एकदा या ठिकाणी भेट द्या.

4) खालील उपकरणांची नावे सांगून त्यांची माहिती मिळावा.





NOT TO BE REPUBLISHED @KTBS

✻✻✻✻

# 3. सतीचे शस्त्र

Q5J7Y4

**परिचय :** **श्री. म. माटे (श्रीपाद महादेव माटे 1886 ते 1957)** मराठीतील प्रसिद्ध कथाकार, समीक्षक, कादंबरीकार होते. पुण्यातील एस पी कॉलेजमध्ये इंग्रजी व मराठी विषयाचे ते प्राध्यापक होते. त्यांनी 'रोहिणी' मासिकाचे संपादन केले. त्याचबरोबर त्यांनी 'केसरी प्रबोध' व 'महाराष्ट्र सांवत्सरिक' (तीन खंड) संपादित केले आहे. त्यांचे अनामिक, अस्पृश्यांचे प्रश्न, उपेक्षितांचे अंतरंग, भावनांचे पाझर, माणुसकीचा गहिवर इत्यादी कथासंग्रह आहेत तर 'पक्षिकेचा वारा' या कादंबरीचे लेखन त्यांनी केले आहे. 1943 साली सांगली येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

'प्रस्तुत पाठ उपेक्षितांचे अंतरंग' या पुस्तकातून घेतला असून गरीब, विधवा स्त्रीच्या असहाय्यतेचा फायदा घेणारे गुंड लोक आणि तिच्या स्वाभिमानाला जपणारे सज्जन लोक यांचे चित्रण यात केले आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य – धैर्य, आत्मविश्वास)



बाळा गवंडी तिसऱ्या मजल्याच्या पायाडावर उभा होता. त्याच्या हातातली करणी ओघळती होऊन थरथरत होती. दाढेला असलेला तंबाखूचा गुळणा तो नुसताच दाबून धरीत होता आणि त्याचे डोळे लाल असले तरी डवरल्यासारखे झाले होते. मधून मधून फुटक्या विटांचे तुकडे तो आजूबाजूला करीत होता, पण बांधकाम अगदी बंद पडले होते. त्याच्या हाताखालचा गडी अधूनमधून त्याच्या तोंडाकडे आणि मधूनमधून सडकेकडे पाहात होता. आणि पायंड्यावरून चुन्याच्या पाट्या वरखाली नेणाऱ्या बाया मधेच थांबून एकमेकींशी कुजबुजत होत्या. खाली रस्त्याच्या तिकाटण्यात जाणाऱ्या येणाऱ्यांची गर्दी उभी राहिली होती आणि शनिवारची शाळा सुटल्यानंतर रेंगाळत घरी येणारी पोरे त्यातच जमा होत होती. भोवतालच्या घरांतील खिडक्या-सज्जांवर आणि अंगणात जमा होऊन घरवाली माणसे चकित होऊन पाहात होती. एखादा भित्रा माणूस आपल्याला काय करावयाचे आहे अशा संभावित ऐटीने बाजूने निघून जात होता. म्युनिसिपालिटीची पेटी रिकामी करून नेण्यास आलेले गाडीवाले, फावडी केरातच खोचून ठेवून, कमरेवर हात ठेऊन, गर्दीकडे पाहात होते. समोरील घराचे मालक दादासाहेब इंजिनियर तोंडात चिरूट धरून अर्धवट हसतमुद्रेने बाळाच्या चलनवलनाकडे रोखून लक्ष देऊन सज्जात उभे होते. दहा-पाच मोलकरणी बाया सहानुभूतीने गर्दीच्या मध्यावर थबकल्या होत्या. डोक्यावरची मळकी काळी टोपी भुवयांपर्यंत दाबून बसविलेली आणि उघडानागडा असा चार-पाच वर्षांचा एक बाळसेदार पोरगा कावराबावरा होऊन रडत होता आणि त्याच्या शेजारी आणि गर्दीच्या मध्यावर पंचवीस-तीस वर्षांची एक विधवा मराठा बाई तिसऱ्या मजल्यावरच्या बाळा गवंड्याकडे अत्यंत त्वेषाने पाहात पाहात आणि आवाज पिळवटून जळफळून ओरडत होती. मेल्या, मुडद्या तुजं मडं गेलं, तुला कुनी आयाभयनी हायती का न्हाइती ! अरं तुजी खोटी नदर आपल्या आईवर चालीव! मुडदारा, अरं, गरीब बाया-बापड्यांस्नी का छळतुयास? सईच्या तोंडाचा पट्टा अगदी अनिवार चालला होता.

सई जवळच्याच एका घरी कामाला जात असे. दोन वर्षांखाली तिचा नवरा वारला होता रामा भिंगरे मोठा मर्द मराठा माणूस होता. तो आणि सई अतिशय सुखाने नांदत असत. मधेच काय झालं कोणास ठाऊक; रामा कामावरून आला आणि टेकून जो बसला तो जागचा हाललाच नाही सई भाकरी टाकत असतानाच रामा आला होता. ताटात भाकरी वाढून ती बाहेर येऊन पाहते तो

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

रामाने मान टाकलेलीच दिसली. त्याच्याशी बोलायलासुद्धा तिला झाले नाही! सईच्या प्रपंचाचा आता उन्हाळा झाला. पण सई दुःखाने हैराण झाली तरी घाबरून गेली नाही. रामा असतानाही ती थोडीबहुत कामे मोलाने करीत असे. नवऱ्याचे पीठ व आपले मीठ मिळून प्रपंच गरिबीचा पण सुखाचा करीत असे. पोर लहानाचे मोठे केले पाहिजे अन् कुणाची मिंधी न बनता चांगल्या नेकीने ती गुजारा करू लागली सई नाकीडोळी नीटस आणि थोडी तांबूस असे. घरची गरिबी असली तरी नवरा असताना, अन् आताही, तिला खाण्यापिण्याला मोताद नव्हती. थोडा कामधंदाही करावा लागत असल्यामुळे, तिची कांती रसरशीत दिसे, तिच्या अंगाखांद्यावर काहीच नव्हते, पण टुकीने राहात असल्यामुळे चोळीलुगडे नेसायला तिला कमी नव्हते. सई कजाग किंवा भांडकुदळ नव्हती हे खरे, पण जिथेतिथे हसणारी किंवा लाघवीही नव्हती. तिचा हा मूळचा स्वभाव वैधव्याच्या आपत्तीने आणि मोलमजुरीच्या जाणिवेने थोडा कडक झाला होता. डोकीवरून पदर घेऊन अन् कोपरांच्या पुढेपर्यंत चोळी घालून ती बाहेर पडली म्हणजे तिच्याकडे रोखून पाहण्याची बुद्धी सहसा कुणाला होण्यासारखी नव्हती. अशी ही मानी पण अश्राप स्त्री दिवसामागे दिवस कामधंदा करून घालवीत होती. नामा पाच वर्षांचा असेल पण त्याच्याकडे पाहिले की, रामाची आठवण व्हावी असे हुबेहूब बापासारखा तो होता. सई त्याच्याकडे पाहून सुखाचा व दुःखाचा मिसळ अनुभव घेत असे.

कामधंदा आटोपून ती जाण्याच्या वाटेवर तीन वाटा भेटतात तेथे एका घराचे काम चालले होते. जाता जाता माचाड वर तिसऱ्या मजल्यापर्यंत गेले होते. बाळा गवंडी भला धष्टपुष्ट, काळाकुळकुळीत आणि रंगेल असे. एकीकडे काम चालू असले तरी एकीकडे त्याचे तोंड चाललेले असायचे. हाताखाली बायकामाणसे असली म्हणजे तर त्याची जिभली सारखी हले. कुणाला ए काकी', कुणाला ए नानी' म्हणून हाक मारावी अन् ती जवळ आली म्हणजे तिच्याकडे रोखून पाहावे अशी त्याची पद्धत होती. मुंडेछाट पांढरी पैरण, डोईला जरीचा तांबडा-लाल रुमाल, अन् हातात चांदीचे दांडगे कडे ही त्याची ऐट कधी बिघडायची नाही. चुना आणणारी, विटा नेणारी कोणी एखादी बाई थोडी देखणी असली की हा अगदी अस्वस्थ व्हायचा. ए भानामती, ए रंगारानी अशा शृंगारिक हाका तो मारू लागे. पोटासाठी कामे करणाऱ्या बाया चिडून जात; पण कामे भर दिवसा चालत असल्यामुळे काही कमी-जास्त होण्याची

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

भीती वाटत नसे. जरा शिष्ट लोकांच्या आळीत काम चालू असल्यामुळे तो आपला पाचकळपणा माणूस पाहूनच सुरू करी. तरीही आसपासच्या स्त्रियांनी ओळखले होते की, हा गवंडी खोट्या नजरेचा आणि चावट स्वभावाचा आहे. त्यांची कुचेष्टा करण्याची त्याची छाती नव्हती पण सडकेवरून येणारी- जाणारी एखादी कुणी दीनवाणी दिसली तर आडपडद्याने पण निर्भयपणाने तो वाईटवाकडे बोलत असे.

सई आपल्या कामधंद्याला त्याच बाजूने जाई. प्रथम एकदोन दिवस त्याने नुसते रोखून अन् टक लावून पाहिले. पण एका सकाळी ही दोनदा दृष्टीस पडत असलेली देखणी स्त्री पाहून त्याच्या चावटपणाला सुरुवात झाली. तो काही बोलला तरी ते आपल्यालाच आहे, असे आपल्यावरच ओढून का घ्यावे अशा बुद्धीने पहिल्या पहिल्याने सईने तिकडे कानाडोळा केला; पण याचा अर्थ त्याने असा केला की, ही मुकाट्याने ऐकून घेत आहे व म्हणून तिला आपला फाजीलपणा पसंत आहे.

तिसऱ्या दिवशी सकाळी दहा साडे दहाच्या सुमाराला नामाला बरोबर घेऊन ती आपल्या वाटेने चालली होती. तिला लांबून पाहताना जनावराला दबकावताना तोंडात जीभ आडवी घालून जसा आवाज काढतात तसा काढावयास त्याने सुरुवात केली; आणि तो आपल्या हाताखालच्या गड्याला पण सईला ऐकू जाईलसे म्हणाला, ''कुठलं पाखरू हाइ रं?'' हे शब्द ऐकातच सईने आपली नेहमीची दृष्टी वर केली आणि खड्या आवाजानं एकदम कडाडली, ''ए मुडद्या, लई फाजीलपणा चालवलास ! तुला काय वाटलं रं! त्वांड लई चुरूचुरू करतंया!'' बाळ्याच्या प्रवृत्तीचे लोक बहुधा भेकड असतात. काम अंगलट येत आहे असे दिसू लागताच ते तोंड लपवितात आणि आपण त्या गावचेच नव्हे, असे दाखवितात. बाळा एवढा रगेल खरा, पण सईचा आवाज कडकडून आल्याबरोबर चपापला व बांधकामाकडे वळला. स्वाभाविकपणे सईला जोर आला. ती पुन्हा ओरडली, ''ए गाडीच्या ! आता त्वांड का लपवतुयास ! अरं, तू मर्दावानी मरद अन् त्वांड का लपवतुयास?'' सडकेची माणसे भराभरा गोळा झाली. सईचा आवाज उंच आणि खणाणून; तिचे हातवारे जोरकस; तिच्या तोंडावर स्त्रीच्या मानीपणाची कांती; ती म्हणाली, ''अरे, तुज मुस्काट हाकडं कर ना!'' बाळाला हे आव्हानच होते. ते परत करणे त्याला भाग होते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

आपल्याकडे काही नसल्याचा आव आणून बाळा तिच्याकडे वळून म्हणाला, ''बया तुमास्नी कोन बोललंया? तुमी आपल्या वाटेनं जा ना!''

आता सई जास्तच चेतली. ती ओरडली, ''आं आता रांडवानी लबाड का बोलतुयास? अरं, मला न्हाई तर तू काई आपल्या भनीला पाखरू म्हनालास काय रं?'' भनीला म्हटल्याबरोबर बाळाला थोडा त्वेष यायला जागा झाली.

तो म्हणाला, ''ए बया, का त्वांड करतीयास फुकाट? तुला कोन बोललया?''

सई आता भांडण सोडीना. ''कोन बोललया? अरं, तू तू बोललास. त्या दगडू दादाला हाताखालचा गडी इचार!'' दगडू बाळाकडे नुसताच पाहू लागला. त्याला पोट होते. खरे काय ते ठाऊक असूनही त्याच्या तोंडातून शब्द निघेना. तो गप्प बसलेला पाहून बाळाला जोर आला.

तो म्हणाला, ''काय दगडू सांगतुया ! काय रे दगड्या!''

दगडू रंजीस आलेल्या आवाजात उद्गारला, ''अरं तुमचं तुमी बगा; आमा गरिबाला त्यात का वडता?''

बाळा शेफारल्यासारखा झाला अन् म्हणाला, ''का ग, ए वडारनी ! काय दिली दगड्यानं साक्शा?''

आता मात्र सईचे पारडे फिरलेसे दिसू लागले. ती ही अंमळ गोंधळली. पण इतक्यात समोरच्या सज्जात बसलेले दादासाहेब इंजिनियर पुढे आले अन् चिरूट बाजूस करून अधिकाराच्या आवाजाने टाफरले,

''ए बाळ्या ! तू त्या मोलकरणीलाच पाखरू म्हणालास ! मी खिडकीतून पाहतो आहे. आता का भितोस?''

ही अनपेक्षित आणि अधिकारी संभाविताची साक्ष ऐकल्याबरोबर बाळाचे सगळे अवसान गेले आणि सई तर पुहा उसळून उठली. ती म्हणाली,

''बग, बग, परमेसर माझा वाली हाय; बग त्ये बाबा काय म्हनत्यात त्ये? अरं मुरदाडा, मला रंडकीमुंडकीला बघून चावटपणा करतुयास? अरं, तुला

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

आयाभईनी हाइत का न्हाइती? अरं, तुला पटकी आली, अन् तुज्या बायलीला कुनी असं बोललं तर कसं वाटल?''

बाळा हैराण होऊ लागला. ''तुला काय वाटलं मी बामनीन बिमनीन हाई, खाली मान घालून मुकाट ऐकून घ्यायला?''

दादासाहेब थोडेसे हसून ऐकू लागले. ''मी म्हराटीन हाइ, मर्दाची अस्तुरी हाइ, तुजं थोबाड फोडल्याबिगर सोडायची न्हाइ.''

नेहमी शांतपणे जात-येत असलेली सई अशी अक्राळविक्राळपणे बोलताना पाहून सगळी माणसे थक्क झाली. आसपासच्या बायका एकमेकींस म्हणाल्या, ''अस्संच पाहिजे असल्या मुर्दाडांना !''

बाळा व्याकुळ झाला. दगडू म्हणाला, ''माजी बया, आता त्येला द्ये सोडून.''

सई भडकून पुन्हा म्हणाली, ''हां! क्यवडं भ्या घ्येतलया तुमी? असल्या वडाऱ्याच्या हाताखाली काम करताया ! अन् तुमच्या लेकीबाळीला छळतुया तर तुमी मुकाट बसताया! बरं का ए वडारा? मालिक मरून गेल्याती; पन् त्यांचा जोडा जपून ठिवलाया म्या! जर का पुना असं बोललास तर त्याच जोड्यानं तुझं पैलवानाचं ढ्यार फोडल्याबिगर ऱ्हायाची न्हाइ!''

इतके बोलून सईने म्हणजे सतीने डोईवरचा पदर नीट सावरला आणि रडवाई झालेल्या नामाला हाताला धरून ती गर्दीतून बाहेर पडली. तिची शेवटची तराटणी हवेत हळूहळू विरत चालली, गर्दी फाटू लागली. बाळा गवंडी तंबाखूचा गोळा गालफडात दाबीत चुन्याच्या पाटीकडे पुन्हा वळला. ऐकत उभी असलेली शाळकरी पोरे परतताना त्याच्याकडे पाहून म्हणाली, ''हट लेका !''

**शब्दार्थ :** करणी - थापी. गुळणा- तंबाखूची गोळी. सडक - रस्ता. पायांड्या - जिन्याच्या पायऱ्या. चलनवलन- हालचाल. नदर - नजर. हैराण- बेजार. प्रपंच - संसार. मिंधी - उपकारात राहणे. मोताद - कमतरता. कांती - तेज. कजाग - भांडखोर. लाघवी - प्रेमळ. वैधव्य - नवरा नसलेली. धष्टपुष्ट - सुदृढ. तऱ्हा - प्रकार. पैरण - बनियन. दांडगे- मोठे. ऐट- रुबाब, तोरा.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

रगेल - वाईट प्रवृत्तीचा असलेला, मस्तीखोर. पाचकळपणा - घाणेरडेपणा. दीनवाणी - गरीब, बापुडी. निर्भय - भय नसलेला. कानाडोळा करणे - दुर्लक्ष करणे. फाजीलपणा - आचरटपणा. भेकड - भित्रा. चपापला- गोंधळलेला. त्वांड- चेहरा. लबाड-धूर्त. रंजीस - त्रासलेला. शेफारणे - चढून बसणे. अंमळ - खूप. अनपेक्षित - अचानक. अवसान - धैर्य. चावटपणा - वात्रटपणा. अस्तुरी - बायको. अक्राळविक्राळ - प्रचंड, मोठा. थक्क होणे - आश्चर्यचकित होणे. मुर्दाड - न ऐकणारा. भडकणे - चिडणे.

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) बाळा गवंडी कसा होता?

2) बाळाच्या प्रवृत्तीची लोक कसे असतात?

3) दगडू काय म्हणाला?

4) सईच्या मदतीला कोण धावून आले?

5) बाळा गवंडी कुठे उभा होता?

6) सईचा नवरा केव्हा वारला होता?

7) सई नाकीडोळी कशी होती?

8) नामा किती वर्षाचा होता?

9) सईने कोणत्या गोष्टीकडे कानाडोळा केला?

10) सईच्या पतीचे नाव काय?

11) गर्दी कशामुळे जमली होती?

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) नामाचे वर्णन करा?

2) बाया, बाळ्या गवंड्याच्या विरोधात तक्रार का करत नसत?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3) सईच्या हल्ल्यातून बाळाला कोणी व कसे वाचवले?

4) रामा भिंगरेच्या मृत्यूचे वर्णन लेखकाने कसे केले आहे?

5) सईच्या प्रपंचाचा उन्हाळा का झाला?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा.**

1) सईचा स्वभाव कडक का झाला होता?

2) बाळ्या गवंडी खोट्या नजरेचा आहे हे स्त्रियांनी कसे ओळखले?

3) सईच्या प्रपंचाचे वर्णन कसे केले आहे?

4) सईच्या प्रश्नावर दगडूने कोणती साक्ष दिली?

5) दादासाहेबांनी सईची बाजू कशी घेतली?

**प्रश्न 4. कोणी कोणास म्हटले आहे .**

1) ''बग, बग, परमेश्वर माझा वाली हाय''

2) ''मी म्हराटीन हाइ, मर्दाची अस्तुरी हाइ''

3) ''पन त्याचा जोडा जपून ठिवलाय म्या ! जर का पुना असं बोललास तर त्याच जोड्यानं तुझं पैलवानाचं ढ्यार फोडल्याबिगर ऱ्हायाची न्हाई''

**प्रश्न 5. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा ओळीत लिहा.**

1) सईचे वर्णन करा?

2) बाळ्या गंवड्याचे वर्णन करा?

3) सतीचे शस्त्र कोणते व सईला सती का म्हटले आहे?

4) बाळ्या गंवड्याची हाताखालच्या स्त्रियांना छेडण्याची पद्धत कशी होती?

❖ **भाषाभ्यास :**

**खालील ओळीतील काळ ओळखा.**

अ) बाळा गवंडी तिसऱ्या मजल्याच्या पायाडावर उभा होता.

आ) चार-पाच वर्षाचा एक बाळसेदार पोरगा कावराबावरा होऊन रडत होता.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**खालील ओळीतील अलंकार ओळखा.**

अ) नामा पाच वर्षाचा असेल पण त्याच्याकडे पाहिले की रामाची आठवण व्हावी असा हुबेहूब बापासारखा तो दिसायचा.

**खालील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

कानाडोळा करणे, चकित होणे, व्याकुळ होणे, तोंडाचा पट्टा चालणे, हैराण होणे.

❖ **उपक्रम :**

1) शंकर पाटलांचे ग्रामीण कथासंग्रह मिळवून वाचा.

2) तुमच्या घरी घरकामाला येणाऱ्या स्त्री विषयी दहा ते पंधरा ओळी लिहा.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

बांधकाम व्यवसायाला लागणारी औजारे ओळखा व त्यांची नावे लिहा.

****

# 4. रसराज – जसराज

E3Q7A8

**परिचय – रामकृष्ण धोंडो बाक्रे** संगीताच्या दुनियेतील फार मोठे संगीत समीक्षक होते. राष्ट्रसेवादलाच्या मुंबई विभागाचे दलप्रमुख आणि बहुविध गुणवत्तेचे पत्रकार होते. 'बुजुर्ग' हा त्यांचा गाजलेला लेखांचा संग्रह आहे. त्यात शास्त्रीय संगीतातील श्रेष्ठ गायकांच्या गाण्याचे विवेचन त्यांनी केले आहे. 'बुजुर्ग' हा लेख 'संग्रह साधना' प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. 22 डिसेंबर 1996 ला रामकृष्ण बाक्रे यांचे देहावसान झाले. त्यांच्या 'भिन्न षड्ज' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या निधनानंतर प्रथम स्मृती दिनी झाले. त्यांचे हेही पुस्तक अत्यंत गाजले आहे.

✻ प्रस्तुत पाठ 'भिन्न षड्ज' या त्यांच्या पुस्तकातून संपादित केलेला आहे.

© KTBS Not to be republished

(मूल्य – कलाप्रेम)





गायनकला, श्रवणकला आणि अध्ययनकला मानवी मन या तीन कलाच आत्मसात करू शकते, असं जे.कृष्णमूर्ती आपल्या प्रवचनातून वारंवार सांगत असतात. ज्या दिवशी पं. जसराज यांचं गायन जे. कृष्णमूर्तीपुढं झालं त्या दिवशी जे. कृष्णमूर्तींनी श्रवणकला किती आत्मसात केली आहे याचं मनोज्ञ दर्शनच घडलं असं म्हणावयास हरकत नाही.

बंगलोरपासून मोटारीनं गेलं तर जे. कृष्णमूर्तींच्या ऋषी व्हॅली स्कूलमध्ये तीन तासांत पोचता येतं. कृष्णमूर्ती फाऊंडेशनचं हे विद्यासंकुल तीनशे एकरांवर वसलेलं आहे. निसर्गसौंदर्यानं नटलेल्या त्या संकुलात झालेली ही एक सायंकालीन मैफल. जे. कृष्णमूर्ती पाऊण तास, फार तर तासभर गायनवादन ऐकतात. नंतर फिरावयास जातात. पुन्हा मैफलीकडं वळत नाहीत. त्यांना पादस्पर्शपूर्वक नमस्कार करायचा नाही. इत्यादी सूचना जसराजांना गायनास आरंभ होण्यापूर्वीच मिळाल्या होत्या.

कृष्णमूर्तींसाठी गायचं होतं हे तर खरंच, पण अन्य श्रोतृसमुदायही होताच. परदेशातून आलेली अनेक मंडळी होती. ऋषी व्हॅली स्कूलमधील हसरी मुलं होती; श्रीमती पुपुल जयकर होत्या, अच्युत पटवर्धन, पमा पटवर्धन हे बंधुद्वयही होते. कृष्णमूर्ती फिरायला निघून गेल्यावर जसराज बराच वेळ या मंडळींना गाणं ऐकवणार होते.

पं. जसराजनी सुरुवातीस पाऊणएक तास भीमपलास पेश केला आणि ते थांबले. 'आणखी थोडं गाल का?' कृष्णमूर्तींनी विचारलं. पंडितजींनी मुलतानी सुरू केला. अर्ध्या तासानंतर मुलतानी संपताच कृष्णमूर्तींनी प्रेमळ शब्दांत विचारलं, 'मी आता फिरायला जाऊ शकतो काय?' पंडितजींनी संमतिदर्शक मान हलविली. कृष्णमूर्ती निघून गेले. स्वाभाविकपणे तिथंच मध्यंतर झालं. कॉफीपानाच्या वेळी कुणी तरी म्हणालं देखील, 'आता मैफल आपलीच आहे. कृष्णमूर्ती काही पुन्हा येणार नाहीत.'

मैफल पुन्हा जमली. तानपुरे झंकारू लागले. कुणी तरी सूचना केली, पंडितजी, 'स्कूलची मुलं भजन ऐकायचं म्हणतात.' पंडितजींनी इशारा करून

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

तानपुरे थांबवले आणि मुलांना उद्देशून विचारलं, ''भजन कसं गाऊ? मी आतापर्यंत जसं गातोय तसं की, अगदी बाळबोध वळणाचं?'' मुलांनी एकमुखी निर्णय दिला, ''आतापर्यंत गात आहात तसंच गा.''

पंडितजींनी मग सायंकालीन पूरियाधनाश्रीत मोहे लागी लगन गुरुचरनन की' हे भजन गायला सुरुवात केली. सरगम चालू असतानाच हार्मोनियमची साथ करणाऱ्या आप्पा जळगावकरांनी हार्मोनियमच्या टोकदार बैठकीनं पंडितजींना टोचलं. पं. जसराजना वाटलं, आप्पांना बसायला जागा अपुरी पडत असावी म्हणून ते पेटीनं टोचीत असावेत. त्यांनी तानपुऱ्यावर बसलेल्या परेश नाईकच्या बाजूला आपली बैठक सरकवली. आप्पा जळगावकरांनी भाता दाबून पुरेशी हवा भरून घेतली आणि मग त्या रिकाम्या हातानं पंडितजींच्या मांडीला जोराचा चिमटाच घेतला. पंडितजींनी प्रश्नार्थक मुद्रा करून आप्पांकडं बघितलं तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की व्हरांड्यातील खांबाला टेकून, डोळे मिटून उभ्या असलेल्या कृष्णमूर्तींचं मैफलीतील पुनरागमन लक्षात घ्यावं, असा इशारा ते करीत होते! हे अपूर्व होतं. ते परत आले होते !

खांबांच्या आधारानं कृष्णमूर्ती पाऊण एक तास तरी उभे असावेत. पुढं ते तिथंच सुखासन घालून बसले आणि जसराजना त्यांनी एक चिठ्ठी पाठविली. तीवर प्रश्न होता, कृपा करून थोडं संस्कृत भाषेच्या आधारानं गाल का? पंडितजींनी चटकन 'जयजय श्री दुर्गे श्री चामुंडारूपे' ही रचना सुरू केली. दरबारी संपेपर्यंत जे. कृष्णमूर्ती एका खांबापासून दुसऱ्या खांबापर्यंत आले होते. बसल्याबसल्या सरकत सरकतच! श्रवणकला कशी संपादावी याचं प्रात्यक्षिक तर नव्हतं ते मग सरळ त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या आसनावरच जे कृष्णमूर्ती येऊन बसले. विनंतीवजा स्वरात म्हणाले, ''आणखी थोडं ऐकवाल?'' पंडितजींची अडाण्यामधील सर्वप्रिय चीज 'माता कालिका' सुरू होऊन तारसप्तकाच्या षड्जावर लगेच घुमूही लागली. जे. कृष्णमूर्तींचं वय 86, पण कसे ताठ. अर्धोन्मीलित दृष्टी ठेवून जणू ध्यानाला बसल्याप्रमाणं बसले होते. अडाणा संपताच म्हणाले, पंडितजी आणखी गाल तर बरं होईल. मला आतून आनंदच आनंद भरून

NOT TO BE REPUBLISHED @KFI

राहिलाय, असं वाटू लागलंय. जसराजनी मग सूरदासाचं भजन 'सबसे उँची प्रेमसगाई' हे ऐकवलं आणि भैरवीनं मैफलीचा शेवट केला.

नेहमीच्या मैफलीत कलावंत जागीच बसलेला असतो आणि श्रोते व्यासपीठाभोवती जमतात. आज तसं घडलं नाही. सर्वांआधी जसराज उठले. सहास्य मुद्रेनं कृष्णमूर्तीपाशी गेले. मनातून त्यांना पादस्पर्शपूर्वकच वंदन करायचं होतं. एकदम निकटवर्तीयांची सूचना ध्यानात आली. तसेच हात जोडून उभे राह्यले. पण इथंही त्यांना वेगळा अनुभव यायचा होता. कृष्णमूर्तींनी दोन्ही बाहू पसरून पंडितजींना कवटाळलं आणि अस्फुट आवाजात म्हणाले, ''Wish we had met earlier.'' ''आपण यापूर्वीच भेटलो असतो तर किती बरं झालं असतं!''

एका आनंदमय अंतर्मुखतेतून उमटलेले उद्गार होते ते.

जसराज यांचं गाणं ऐकणारा प्रत्येक श्रोता कृष्णमूर्तीप्रमाणं अंतर्मुख होत असेल असा दावा मी करीत नाही. कृष्णमूर्तींनी हयातभर अंतर्मुख होण्याची साधना केलेली आहे,श्रवणकला आत्मसात केली आहे. म्हणूनच अभिजात गायकीचा परिणाम मोजण्याचे ते मानदंड होऊ शकतात आणि पं. जसराज यांचं या कलेतील स्थानही त्यामुळं लक्षात येतं.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**शब्दार्थ :** षड्ज – संगीतातील पहिला स्वर सा. आत्मसात करणे– साध्य करून घेणे. मनोज्ञ – सर्वांगपरिपूर्ण. ज्ञ = जाणिव. मनोज्ञ = मनःपूत जाणीव. पादस्पर्श पूर्वक नमस्कार करणे – पायास हात लावून नमस्कार करणे. श्रोतृ समुदाय – ऐकणारे रसिक.

**टिपा :**

1. **जे कृष्णमूर्ति :** यांचा जन्म 12 मे 1895 मध्ये आंध्र प्रदेशातील तेलगू ब्राम्हण कुटुंबात झाला होता. चिन्तूर जिल्ह्यातील मदनपल्ली या गावी त्यांचा जन्म झाला. वयाच्या दहाव्या वर्षी त्यांच्या आईचे निधन झाले,

तेव्हा वडील मुलांसह मद्रास मधील उड्यार भागातील थियोसोफिकल सोसायटीच्या परिसरात जाऊन राहू लागले. त्यासाठी ॲनी बेझंट यांनी त्यांची मदत केली. लहानपणीचे जे. कृष्णमूर्तिच्या बुद्धिची चमक पाहून हा मुलगा मोठा तत्वज्ञ होऊन साऱ्या विश्वाला मार्गदर्शन करेल असा विश्वास बेझंटबाईना वाटत होता.

1920 मध्ये जे कृष्णमूर्ति पॅरिसला गेले आणि त्यांनी फ्रेंच भाषेत प्राविण्य मिळविले. दुसऱ्या महायुद्धानंतर ते कॅलिफोर्नियास गेले. पुन्हा भारतात परतल्यानंतर आपल्या विचाराना मूर्त रूप देण्यासाठी अनेक शाळा व महाविद्यालयांची स्थापना केली.

एक प्रसिद्ध तत्वज्ञ म्हणून त्यांनी जगात मार्गदर्शन केले ध्यान, विज्ञान आणि सृजनशीलता, शिक्षा आणि संवाद, शिकण्याची कला प्रेम, अशा विविध विषयावर त्यांनी चिंतनात्मक लेखन केले आहे. संगीत हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. कला आपल्याला परमेश्वरापर्यंत घेऊन जाणारी सुंदर आणि महत्वपूर्ण गोष्ट आहे असे ते म्हणत.

2. **जसराज :** पंडित जसराज एक सुप्रसिद्ध भारतीय गायक होते. ज्यांनी जगभर भारतीय संगीताचा प्रचार आणि प्रसार केला. त्यांचा जन्म 28 जानेवारी 1930 मध्ये हरियाणाच्या हिसार या गावी झाला. 17 ऑगस्ट 2020 मध्ये अमेरिकेतील न्यू जर्सी येथे हृदयविकाराने त्यांचा मृत्यू झाला. ते मेवाती' घराण्याचे गायक होते. शास्त्रीय, अर्धशास्त्रीय, भक्ती संगीत फिल्म साउंड ट्रेक अशा विविध प्रकारात त्यांनी आपली कला सादर केली. त्यांचा आवाज अत्यंत मधुर होता म्हणून रसिक त्यांना रसराजच म्हणू लागले.

**इंटरनॅशनल एस्ट्रोनॉमिकल युनियनने** सौर मंडळातील एका छोट्या ग्रहाला त्यांचे नाव दिले होते. हा सन्मान मिळवणारे ते पहिले कलाकार होत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पद्मश्री पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, पद्मभूषण पुरस्कार, पु. ल.देशपांडे ॲचिवमेंट, मारवाड संगीतरत्न, मास्टर दिनानाथ मंगेशकर पुरस्कार, महाराष्ट्र गौरव पुरस्कार, अशा असंख्य पुरस्कारांनी ते गौरवले गेले आहेत. आपली कला ही आपली पूजा आहे. त्यातच ईश्वर आहे हा इतर अनेकांप्रमाणे त्यांचाही विश्वास होता.

भीमपलास, पुरियाधनश्री, दरबारी, अडाणा, भैरवी ही सर्व हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील रागांची नावे आहेत. शास्त्रीय संगीतातील राग हे दिवसाच्या वेगवेगळ्या प्रहरी गाण्याची पद्धत असते.

तानपुरे म्हणजे तंबोरा, हार्मोनियम म्हणजे पेटी किंवा संवादिनी, ही शास्त्रीय गायनासाठी साथ करणारी वाद्ये आहेत.

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) मानवी मन कोणत्या तीन कला आत्मसात करू शकते असे जे. कृष्णमूर्ती म्हणतात ?
2) ज्या दिवशी जसराजांचं गाणं जे. कृष्णमूर्ती यांनी ऐकले त्या दिवशी कोणत्या मनोज्ञ गोष्टीचे दर्शन घडले असे लेखक म्हणतो?
3) बेंगलोर पासून मोटारीने गेल्यास किती वेळात ऋषी व्हॅली स्कूलमध्ये पोचता येते ?
4) मैफलीच्या सुरुवातीला पंडित जसराजानी कोणता राग सादर केला?
5) स्कूलच्या मुलांना पंडितजींनी काय गावे असे वाटत होते? पंडितजींनी कोणते भजन सादर केले?
6) पेटी वाजविणाऱ्या व्यक्तीचे नाव काय?
7) संस्कृत भाषेतील कोणती रचना जसराजांनी गाईली?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) जे. कृष्णमूर्तींबद्दल जसराजांना कोणत्या सूचना करण्यात आल्या होत्या?

2) ऋषी व्हॅलीत जसराज कोणाकोणासमोर गाणार होते ?

3) मैफलीत खांबाच्या आधाराने उभे असलेल्या कृष्णमूर्तींनी काय केले?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा ओळीत लिहा.**

1) आप्पा जोगळेकरानी गात असलेल्या जसराजांना का चिमटा घेतला ?

2) आप्पा जोगळेकर टीप लिहा.

3) जे.कृष्णमूर्ती मैफलीत परत आल्यानंतर काय घडले?

4) श्रवणकला कशी संपादावी याचे प्रात्यक्षिक म्हणजे कृष्णमूर्ती स्पष्ट करा?

5) मैफल संपल्यानंतर काय घडले?

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

❖ **भाषाभ्यास :**

**अनेक शब्दांबद्दल एक शब्द लिहा.**

1) गायन करणारा –

2) ऐकण्यासाठी उपस्थित असलेले लोक –

3) पेटी, तबला व इतर वाद्ये वाजविणारे –

❖ **उपक्रम :**

1) तुमच्या गावातील एखाद्या गायकाची माहिती मिळवा व त्याचे संकलन करा.

2) तुम्हाला आवडणारे गाणे मित्रांना ऐकवून त्यापासून मिळणाऱ्या आनंदाचा आस्वाद घ्या व त्यावर चर्चा करा.

3) एखाद्या संगीत शिक्षकाची मुलाखत घ्या.

## आपण समजून घेऊया.

**✻ खालील वाक्य वाचून उत्तरे लिहा.**

मी पत्र लिहितो.

(अ) लिहिणारा तो कोण → [ ] कर्ता

(आ) लिहिले जाणारे ते काय → [ ] कर्म

(इ) वाक्यातील क्रिया कोणती → [ ] क्रियापद

वाक्यात कर्त्याला किंवा कर्माला प्राधान्य दिल्यामुळे क्रियापदाचे रूप त्याच्याप्रमाणे बदलत असते. वाक्यातील कर्ता ⟷ क्रियापद, कर्म ⟷ क्रियापद या संबंधाला 'प्रयोग' असे म्हणतात.

**प्रयोगाचे मुख्य तीन प्रकार आहेत.**

(1) कर्तरी प्रयोग (2) कर्मणी प्रयोग (3) भावे प्रयोग

## (1) कर्तरी प्रयोग

**✻ वाक्याच्या शेवटी 'येणे' या क्रियापदाचे योग्य रूप वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(1) मी शाळेतून आत्ताच............................. (येणे)

(2) ती शाळेतून आत्ताच............................. (येणे)

(3) रवी शाळेतून आत्ताच............................. (येणे)

(4) विद्यार्थी शाळेतून आत्ताच..........................(येणे)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

✻ **जेव्हा कोणत्याही वाक्यात कर्त्याच्या लिंग, वचन व पुरुषानुसार क्रियापदाचे रूप बदलते, तेव्हा त्यास 'कर्तरी प्रयोग' असे म्हणतात.**

## कर्तरी प्रयोगाची वैशिष्ट्ये

- कर्ता प्रथमा विभक्तीत असतो.
- कर्म असल्यास ते प्रथमा किंवा द्वितीया विभक्तीत असते.
- वाक्यातील क्रियापद कर्त्याच्या लिंग, वचन व पुरूषानुसार बदलते.

उदा: खालील वाक्यांमध्ये 'जाणे' हे क्रियापद कर्त्याप्रमाणे बदललेले दिसते.

(अ) तो शाळेत जातो.

(आ) ती शाळेत जाते.

(इ) ते शाळेत जातात.

(ई) तू शाळेत जातोस.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

✻ **कंसातील क्रियापदाचे योग्य रूप वापरून वाक्ये पूर्ण करा.**

(1) मुली क्रिकेट................................ ....... (खेळणे)

(2) तुम्ही क्रिकेट ....................................(खेळणे)

(3) आम्ही क्रिकेट.......................................(खेळणे)

(4) जॉन क्रिकेट ..........................................(खेळणे)

(5) समीरा क्रिकेट........................................ (खेळणे)

✻✻✻✻

# 5. सीड मदर – राहीबाई पोपेरे

H3N2L5

– संपादित लेख

**परिचय :** **श्री मधुकर मारुती लोहार (जन्म 1954)** शिक्षण एम. ए. बी. एड. मराठीचे अभ्यासू शिक्षक. वॉलकॉट अकॅडमी गोकाक हायस्कूल मध्ये सहशिक्षक म्हणून 36 वर्षे सेवा केली. मराठी व समाज विज्ञान विषयाचे अध्यापन केले. वाचन व योग यांची आवड. सध्या बेळगाव येथे वास्तव्य. इयत्ता आठवी व इयत्ता दहावी प्रथम भाषा मराठी पाठ्यपुस्तक मंडळाचे ते सदस्य आहेत.

✻ हा लेख संकेतस्थळे व वृत्तपत्रीय लेखांवरुन संपादित केलेला आहे.

(मूल्य – परंपरासंवर्धन)



पद्मश्री राहीबाई पोपेरे या आपल्या देशातील एक कृषीतज्ज्ञ आणि पर्यावरणवादी महिला शेतकरी आहेत. देशी वाणांच्या बियांणाची जपणूक केल्याबद्दल भारत सरकारने 2020 साली त्यांना ‘पद्मश्री’ पुरस्काराने सन्मानित केले आहे.

राहीबाईचा जन्म 1964 मध्ये ‘अहमदनगर’ जिल्ह्यातील कोंभाळणे’ या गावी झाला. घरची गरीबी होती. राहीबाईचे वडील शेतकरी होते. त्यांची चार-पाच एकर कोरडवाहू शेती होती. राहीबाईना सात भावंडे होती. अल्पवयात त्यांच्या आईचे निधन झाले. त्यामुळे राहीबाईना

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

इतर भावंडासह शेतीत लक्ष घालावे लागले. गावात शाळा नव्हती. वीज नव्हती. धड रस्ताही नव्हता. पंधरा वीस घरांचा एक लहानसा आदिवासी पाडा होता. त्या कधी शाळेत गेल्याच नाहीत. शेतीत काम करता करता, तीच त्यांची शाळा बनली. शेतीतील धान्यांच्या वाणासंबंधी आणि नैसर्गिक शेतीविषयी सतत ज्ञान मिळवत होत्या.

हळूहळू धान्याच्या बीयांसंबंधीची खूप माहिती त्यांनी मिळविली. आपल्या मालकीच्या शेतातच त्या प्रयोग करु लागल्या, रासायनिक खते वापरून निर्माण केलेल्या धान्यामुळे मुले-बाळे सतत आजारी पडतात. आशा धान्याचे दीर्घकाळ सेवन केल्याने माणसाच्या प्रकृतीवर त्याचा परिणाम होतो, हे लक्षात आल्यावर त्यांनी नैसर्गिक शेतीचा अवलंब करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला फक्त स्वतःच्या परिवारासाठी हा प्रयोग त्यांनी केला. हळूहळू कोंभाळणेमधील इतर शेतकऱ्यांनाही राहीबाईचे काम पाहून आपणही अशाच प्रकारे धान्य पिकवावे असे वाटू लागले. अनेक लोक राहीबाईचे शेतातले प्रयोग पाहून प्रभावीत होत होते. राहीबाईनी वेगवेगळ्या सतरा प्रकारच्या धान्याची लागवड आपल्या शेतात केली. महाराष्ट्रातले आदिवासी शेतकरी पारंपारिक धान्याचे पुनरूज्जीवन करतात. राहीबाईनी हेच काम आता हातात घेतले. ऐंशींहून अधिक बियांच्या जाती वाचवण्यांचे काम त्यांनी सुरवातीलाच मोठ्या धडाडीने केले.

भारतातील सर्वश्रेष्ठ वैज्ञानिक रघुनाथ माशेलकर यांनी राहीबाईना बीजमाता म्हणून सर्व प्रथम संबोधीत केले. तेंव्हापासून लोक त्यांना याच नावाने ओळखू लागले. जगातील सर्वश्रेष्ठ शंभर महिलांची यादी बी.बी.सी. ने 2018 मध्ये प्रकाशित केली त्यात राहीबाईचा समावेश होता. ही प्रत्येक भारतीय स्त्रीला अभिमान वाटावी अशीच गोष्ट आहे.

राहीबाईनी स्वतःचे असे पाणी साठविण्याचे तंत्र विकसित केले. दोन एकर नापीक जमीन ओलीताखाली आणून त्यात लागवड करण्यास सुरुवात केली. कमी पाण्यात अधिक पीक काढण्याचे तंत्रही त्यांनी विकसित केले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

हळूहळू लांब-लांबून शेतकरी, विद्यार्थी, गावागावातले लोक त्यांच्या भेटीस येऊ लागले. बी कसे निवडावे, जमिनीचा कस कसा वाढवावा, याविषयी त्या लोकांना मार्गदर्शन करू लागल्या. शेतकऱ्यांना उत्तम बियाणे मिळावीत म्हणून त्यांनी 'सीड बँक' तयार केली व त्याच्यामार्फत बियाणे दिली जाऊ लागली. 'दी कॉन्सिल ऑफ सायंटोफोक अॅण्ड इंडस्ट्रीयल रिसर्च' या संस्थेने 'सीड मदर' हा किताब देऊन त्यांचा सन्मान केला. देशी भाज्या, फळे, भाताच्या विविध जातीची बियाणे यांचे संरक्षण आणि संवर्धन केल्यामुळे त्यांच्या या कार्याचा अशा पद्धतीने गौरव केला गेला.

आसपासच्या गावातील शेतकऱ्यांना एकत्र आणून स्वयंसहायता समूहाची स्थापना राहीबाईनी केली. 'कळसूबाई बीज संरक्षण' समितीच्या त्या एक सक्रीय सदस्य आहेत. वर्षातून चार पीके येणारी शेती त्या करतात. कुक्कुटपालन तंत्रही त्यांनी शिकुन घेतले आहे. गावठी भाज्या, गावठी धान्ये याची निर्मिती करताकरता या माऊलीने बाहत्तर लाख गावठी बियाण्णांचे जतन करून त्याचे सीडबँकेच्या माध्यमातून वितरण करण्याचे काम केले आहे. आता त्यांच्यामुळे कोंभाळणे गावाची ख्याती इतकी वाढली आहे की, दररोज त्यांच्या गावाला किमान शंभर विद्यार्थी भेट देतात. गावठी भाज्या आणि धान्याची माहिती घेतात.

राहीबाईच्या घरातला तांदूळ शिजायला लागला की, एक किलोमीटर अंतरापर्यंत त्याचा सुगंध दरवळत असतो. पूर्णतः पारंपारिक व चविष्ठ अशी ही बियाणे जगात फक्त राहीबाईकडेच आहेत. त्या खऱ्या अर्थाने अन्नपूर्णाच होत. एक अस्सल वाल त्यांच्याकडे वीस प्रकारमध्ये उपलब्ध आहेत. ही बियाणे त्या पारंपारिक पद्धतीने मोठ-मोठ्या मातीच्या माठात जतन करून ठेवतात.

आपल्या भूमातेला जपणाऱ्या तिच्या उदरातून निघणाऱ्या बियाणांचे निकोप आणि नैसर्गिक पद्धतीने जतन करून, असंख्य लोकांच्या पोटात सात्विक

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

अन्न घालणाऱ्या या अन्नपुर्णेने तिच्यासारख्या असंख्य अन्नपूर्णा बनवून स्त्री-सबलीकरणाचाही एक उत्तम प्रयोग करून दाखविला आहे.

प्रत्येक गावागावात जसा पैशाचा व्यवहार करणाऱ्या बँका आहेत तशाच सात्विक बीज देणाऱ्या बँका व्हाव्यात अशी तिची इच्छा आहे. 'अन्न हे पूर्ण ब्रम्ह' असे आपण म्हणतो. या माऊलीमुळे खऱ्या अर्थाने ते पूर्णब्रम्ह बनलं आहे. आजच्या प्रदुषित वातावरणात आणि केमिकलमिश्रीत जगात आपल्या पुढच्या पिढीसाठी असे बहुमोल कार्य करणाऱ्या राहीबाईंनी जगाला एक नवी राह, एक नवा रस्ता दाखविला आहे.

**शब्दार्थ :** सीडमदर - बीजमाता. कृषीतज्ज्ञ - शेतीतज्ज्ञ. पर्यावरणवादी-निसर्गाप्रमाणे वागणारा. कोरडवाहू- पावसाच्या पाण्यावर चालणारी शेती. निधन - मृत्यू, मरण पावणे. पाडा - लहानवस्ती. वाण - बियाणांची जात. रासायनिक खते - वेगवेगळी घातक रसायने वापरून केलेली खते. सेवन करणे - खाणे. परिवार- कुटुंब. पुनरुज्जीवन - परत निर्मिती. पारंपरिक - पूर्वी पासून चालत आलेले. धडाडी - धैर्याने. अभिमान - गौरव. गर्व. नापीक - पीक न येणारी जमीन. ओलीता खाली आणणे - शेती लागवडीस योग्य करणे . कृत्रिम - बनावट. तंत्र - योजना. सीड बँक -बियाणे साठविण्याची संस्था. कुक्कुटपालन - कोंबड्यांचे पालन. वितरण - वाटप. स्वयंसहायता - स्वतःच्या मदतीने. सक्रीय - क्रियाशील. सदस्य- सभासद. समिती - संस्था. सुगंध- सुवास. चविष्ठ - रुचकर. माठ - मातीचा घडा. जतन - जपणुक. उदर - पोट. सात्विक - सत्वयुक्त. अन्नपूर्णा - एका देवीचे नाव जी सर्वांना अन्न पुरविते, उत्तम स्वयंपाक करणारी स्त्री . माऊली - माय, माता, आई. सबलीकरण - सशक्त करणे. केमिकलमिश्रीत - रसायन मिसळलेले. बहुमोल - मोठ्या किंमतीचे. प्रदूषित - दूषित असलेले.

**टीप :** आदिवासी - 'आदि' म्हणजे 'पहिला' आणि 'वासी' म्हणजे 'राहणारा' त्यामुळे आदिवासी म्हणजे पहिला 'वासी' किंवा 'मूळ रहिवासी'.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) सौ. राहीबाई पोपेरे यांना कोणत्या नावाने ओळखले जाते?
2) राहीबाईचा जन्म केव्हा व कुठे झाला?
3) भारत सरकारने त्यांना कोणत्या पुरस्काराने सन्मानित केले?
4) राहीबाई सतत कोणते ज्ञान मिळवित होत्या?
5) लहान मुले सतत आजारी का पडत?
6) राहीबाईनी किती प्रकारच्या धान्याची लागवड केली?
7) पारंपारिक धान्याचे, पुनरुज्जीवन कोणी केले?
8) राहीबाईना बीजमाता म्हणून प्रथम कुणी संबोधिले?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) राहीबाई पोपेरे कोण होत्या? सरकारने त्यांना का सन्मानित केले?
2) राहीबाईंनी कोणत्या शेतीचा अवलंब केला? त्या शेतीचा प्रभाव कुणावर झाला?
3) राहीबाईंना भेटण्यास कोणकोण येऊ लागले व का?
4) राहीबाईंच्या तांदळाचे काय वैशिष्ट्य होते?
5) भारतीय स्त्रीला त्यांचा अभिमान का वाटावा अशी कोणती गोष्ट आहे?
6) राहीबाई कोणते नवीन तंत्र शिकल्या? किती गावठी बियाणांचे उत्पादन त्यांनी केले?

## प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा.

1) राहीबाईंना कोणता किताब देऊन सन्मानित केले? का?

2) स्त्री सबलीकरणासाठी राहीबाईंनी काय केले?

## प्रश्न 4. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा ओळीत लिहा.

1) राहीबाई पोपेरे यांचा थोडक्यात परिचय द्या?

2) राहीबाईंनी केलेले शेतीतील प्रयोग सांगा.

3) राहीबाईंनी लोकांना शेतीविषयक कोणते मार्गदर्शन केले?

4) राहीबाईंच्या सीड बँकेविषयी माहिती द्या?

## ❖ भाषाभ्यास :

✻ **खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**
सक्रीय, सुगंध, उदार, माउली, निधन.

✻ **खालील शब्दांचे लिंग ओळखून लिहा.**
आई, शिक्षक, भाऊ, वीज, वाटी.

## ❖ उपक्रम :

1) राहीबाई पोपेरे यांच्या कार्यसंस्थाना भेटी द्या.

2) रासायनिक आणि कृत्रिम खते यातील भेद समजावून घ्या

3) 'राहीबाई पोपेरे' यांच्याप्रमाणे आपण आपल्या अंगणात देशी बी-बियाणांची रुजवण करा.

4) बेळगाव परिसरात 'श्री. शिवाजी कागणीकर' अशा प्रकारचे कार्य करीत आहेत, त्यांची भेट घेऊन त्यांच्या कार्याची चर्चा करा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



## (2) कर्मणी प्रयोग

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**✻ खालील वाक्ये वाचा. निरीक्षण करा व कृती पूर्ण करा.**

(अ) (1) तुषारने आंबा खाल्ला. (2) स्वातीने आंबा खाल्ला.
(3) मुलांनी आंबा खाल्ला. (4) मुलींनी आंबा खाल्ला.

कृती–कर्त्याचे लिंग, वचन बदलल्यानंतर क्रियापद बदलते का? ☐

(आ) (1) तुषारने आंबे खाल्ले. (2) स्वातीने चिंच खाल्ली.
(3) मुलांनी चिंचा खाल्ल्या. (4) मुलींनी टरबूज खाल्ले.

कृती– कर्माचे लिंग, वचन बदलल्यानंतर क्रियापद बदलते का? ☐

जेव्हा वाक्यांत कर्माच्या लिंग, वचनाप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलते, तेव्हा त्यास **'कर्मणी प्रयोग'** असे म्हणतात.

### कर्मणी प्रयोगाची वैशिष्ट्ये

| | | |
|---|---|---|
| कर्ता सामान्यतः तृतीया विभक्तीत असतो. | कर्म नेहमी प्रथमा विभक्तीत असते. | क्रियापद कर्माच्या लिंग, वचनानुसार बदलते. |

## (3) भावे प्रयोग

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**✻ खालील वाक्ये वाचा, निरीक्षण करा व कृती पूर्ण करा.**

(1) शिक्षकाने विद्यार्थ्याला शिकवले.

(2) शिक्षिकेने विद्यार्थ्यांना शिकवले.

(3) त्यांनी विद्यार्थ्यांना शिकवले.

(4) मी विद्यार्थिनीला शिकवले.

**कृती–** (1) वरील वाक्यांतील क्रियापदात बदल आढळतो का? ☐

(2) कर्ता आणि कर्म यांचे लिंग व वचन प्रत्येक वाक्यात बदलले आहे का ? ☐

**जेव्हा क्रियापदाचे रूप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंगवचनाप्रमाणे बदलत नसून ते नेहमी तृतीयपुरुषी नपुंसकलिंगी, एकवचनी असून स्वतंत्र असते, तेव्हा त्यास 'भावे प्रयोग' असे म्हणतात.**

### भावे प्रयोगाची वैशिष्ट्ये

- कर्ता सामान्यतः तृतीया विभक्तीत असतो.
- कर्म असल्यास द्वितीया विभक्तीत असते.
- क्रियापद नेहमी तृतीय पुरुषी, नपुंसकलिंगी एकवचनी असते व कर्ता किंवा कर्माच्या लिंग, वचनानुसार ते बदलत नाही.

**※ पुढील वाक्यांतील प्रयोग ओळखा.**

(1) त्याने मागे वळून बघितले.

(2) विज्ञानाने माणसाला दृष्टी दिली.

(3) तो नेहमी नवे संकल्प करतो.

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**※ कर्तरी, कर्मणी व भावे या प्रयोगांची प्रत्येकी पाच-पाच वाक्ये तयार करा.**

**कर्तरी प्रयोग**

1)

2)

3)

4)

5)

**कर्मणी प्रयोग**

1)

2)

3)

4)

5)

**भावे प्रयोग**

1)

2)

3)

4)

5)

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

****

# पद्य विभाग

## 1. साधूची आत्यंतिक समता

**परिचय : संत ज्ञानेश्वर (जन्म 1275 मृत्यू 1297)** जन्म आपेगाव या ठिकाणी झाला व आळंदी येथे त्यांनी संजीवन समाधी घेतली. त्यांच्या आईचे नाव रुक्मिणी व वडिलांचे नाव विठ्ठलपंत असे होते. निवृत्तीनाथ, सोपान, मुक्ताई ही त्यांची भावंडे होय. निवृत्तीनाथ हे त्यांचे मोठे बंधू. हेच त्यांचे सद्‌गुरु होते. ज्ञानदेवांनी वयाच्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली. ज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, व हरिपाठाचे अभंग अशी विपुलरचना केलेली आहे. त्यांना भागवत संप्रदायाचे प्रवर्तक मानले जाते. ज्ञानेश्वरीला मराठी वाङ्मयाचे देशीकार लेणे म्हटले आहे. मराठी भाषेविषयी त्यांच्या मनात अतिशय अभिमान होता. त्यांनी ज्ञानेश्वरीत ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तीयोग सांगितला आहे. त्यांना 21 वर्षांचे अल्पायुष्य लाभले.

प्रस्तुत कविता गुरुदेव रानडे यांच्या 'ज्ञानेश्वर वचनामृत' या ग्रंथातून घेतली आहे. अनेक दृष्टांत देऊन ज्ञानेश्वरांनी साधूचा समत्व भाव कसा असतो ते येथे दाखवून दिले आहे. शत्रु मित्रांना समभावाने पहाणारा, दीपाप्रमाणे सर्वत्र उजेड धरणारा, वृक्षाप्रमाणे सुष्ट-दुष्ट सर्वांना समान सावली देणारा, ऊसाप्रमाणे लावणी करणाऱ्याला व चरकात पिळणाऱ्याला दोघांनाही गोड गोडवा देणाऱ्याप्रमाणे साधू असतो. त्याला निंदास्तुती कशाचाही फरक पडत नाही असे त्यांच्या समतेचे चित्र ज्ञानेश्वर करतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## (मूल्य – समभाव)



पार्था जयाचिया ठायी। वैषम्याची वार्ता नाहीं।
रिपु मित्रां दोहीं। सरिसा पाडू।।
का घरिचियां उजेड करावा। परिकियां आंधार पाडावा।
हे नेणेचि गा पांडवा। दीप जैसा।।
जो खांडावया घाव घाली। कां लावणी जयाने केली।
दोघां एकचि साउली। वृक्ष दे जैसा।।
नातरि इक्षुदंडू। पाळितया गोडु गाळितया कडु। नोहेचि जेवी ।।
अरिमित्री तैसा। अर्जुना जया भाव ऐसा ।
मानापमानी सरिसा। होत जाय ।।....।।

जो निंदेतें नेघें। स्तुती न श्लाघे।
आकाशा नलगे । लेप जैसा ।।...।।
साच लटिके दोन्ही। न बोले जाहला मौनी।
जो भोगितां उन्मनी। आरायेना।।
जो यथालाभे संतोषे। अलाभें न पारुखे।
पाऊसेंविण न सुके। समुद्र जैसा ।।
आणि वायूसी एके ठायी। बिढार जैसे नाही।
तैसा न धरीच कही । आश्रय जो ।। 0 ।।
हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर
किंबहुना चराचर। आपण जाहला।

**शब्दार्थ :** सरिसा – सारखा. पाडू – योग्यता. उन्मनी – योगाची मग्न अवस्था, मुक्ती. नेणेचि – जाणत नाही. आरायेना – तृप्त होत नाही. वैषम्य – खेद, दुःख. पार्थ – अर्जुन. खंडणे – तोडणे. इक्षुदंडू – ऊस. नोहे – नव्हे. अरि – शत्रु. ने घे – घेत नाही. साच – खरे. लटिकें – खोटे. पारुखे – रागवत नाही. बिढार – आश्रय. घरिचिया – घरच्या, आपल्या. परिकिया – परके, दुसरे. विश्व – जग, चराचर. श्लाघे – प्रशंसा

**कवितेचा सरळ अर्थ (भावार्थ):** हे अर्जुना, ज्याच्याजवळ दुःख, खेद असत नाही, जो मित्र आणि शत्रू यांना सारख्याच दृष्टीने पाहतो, त्यांना समान समजतो असे साधूचे आचरण असते. अरे, दिव्याजवळ घरच्यांना, फक्त उजेड द्यावा आणि परक्यांना अंधार द्यावा अशी भावना नसते, तसे साधूचे आचरण असते. तो सर्वांच्याकडे समान भावनेने पाहतो. वृक्ष किंवा झाड ज्यांनी लावले त्यालाही सावली देते व जो तोडतो त्यालाही सावली देते, म्हणजे दुजाभाव करत नाही, तसे साधू समदृष्टीने राहतात. ऊस जो लागवड करतो, वाढवितो त्यालाही गोड रस देतो व जो तोडतो, चरख्यातून पिळतो त्यालाही गोडच रस देतो. ऊसाचा समानता गुणधर्म साधूजवळ असतो. अर्जुना, ज्याच्याजवळ शत्रू मित्र असा कोणताच भेदभाव असत

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

नाही, मान–अपमान अर्थात निंदास्तुतीही त्याला सारखीच असते, तसे साधू निरिच्छ असतात. आकाशाला ज्याप्रमाणे कोणताही लेप लावता येत नाही तसेच साधूचे चरित्रही निर्लेप असते. खरे–खोटे जरी ऐकले तरी, साधू आपले मत व्यक्त करीत नाहीत, मौन पाळून राहतात. जे भोगी असतात ते नेहमी अतृप्त असतात. साधू नेहमी तृप्त असतो. फायदा झाला तरी आनंदी होत नाही व तोटा झाला तरी दुःखी होत नाही. ज्याप्रमाणे समुद्र पाऊस पडो वा न पडो सुकत नाही तसे साधू असतात. वारा हा चंचल आहे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकत राहतो, फिरत राहतो तसा साधू संपूर्ण विश्वात संचार करीत असतो. त्याला घर नसते. हे विश्वच त्याचे घर असते. अर्जुना, जग, विश्व, सारे चराचर हेच आपले घर मानण्याची ज्यांची वृत्ती असते ते या चराचराशी एकरूप होऊन जातात अशी साधूची समता असते.

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) पार्थ कोणास म्हटले आहे?
2) दीपाचे कार्य कोणते?
3) ऊस कोणाकोणासाठी गोड असतो?
4) आकाशाला काय लागत नाही?
5) पाऊस पडला नाही तरी कोण सुकत नाही?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) झाडाचे वैशिष्ट्य कोणते?
2) ऊसाची आत्यंतिक समता कोणती?
3) साधूच्या कोणत्या गुणाचे दर्शन या कवितेतून होते?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.**

1) साधूच्या समतेचे वर्णन ज्ञानेश्वरांनी कसे केले आहे?

2) ज्ञानेश्वरांनी कोणत्या दृष्टांताचा वापर करून साधूंचे गुणदर्शन केले आहे?

3) 'किंबहुना चराचर आपण जाहला' या ओळीचा अर्थ सांगून या कवितेतील त्याचे महत्त्व सांगा.

4) 'साधूची आत्यंतिक समता' या कवितेचा आशय सांगा.

## ❖ भाषाभ्यास :

**खालील शब्द वाचून चौकोनात विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | | |
|---|---|---|
| अरि x ☐ | संतोष x ☐ | स्थिर x ☐ |
| मान x ☐ | निंदा x ☐ | साच x ☐ |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## ❖ उपक्रम :

1) 'संत ज्ञानेश्वर' हा चित्रपट सर्वांनी पालकांसह पहावा.

2) निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई या ज्ञानेश्वरांच्या तीन भावंडांची माहिती मिळवून वाचा.

3) वर्गात ज्ञानदेवांचे 'अभंग' म्हणा व ऐकवा.

## भाषासौंदर्य

**खालील म्हणी पूर्ण करा.**

(1) मूर्ती लहान पण ______

(2) शितावरून ______

(3) सुंठीवाचून ______

(4) ______ सोंगे फार.

(5) ______ खळखळाट फार.

(6) दोघांचे भांडण ______

(7) ______ सव्वालाखाची.

(8) ______ चुली.

(9) ______ आंबट.

(10) अंथरूण पाहून ______

(11) इकडे आड ______

(12) ______ गावाला वळसा.

(13) ______ तळे साचे.

(14) ______ उपाशी.

(15) ______ आरसा कशाला?

****

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 2. दादला नलगे बाई

J6G5G8

**परिचय:** **संत एकनाथ (जन्म 1538– मृत्यू 1599)** हे पैठणचे रहिवासी. 'जनार्दन स्वामी' हे त्यांचे गुरु असून त्यांच्यावर भागवत संप्रदायाचा प्रभाव होता. प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय नाथांच्या जीवनात आढळतो. ज्ञानेश्वरीच्या प्रतीचे शोधन, संपादन व ज्ञानेश्वरांच्या समाधीचा जीर्णोद्धार त्यांनी केला. 'एकनाथी भागवत', 'भावार्थ रामायण', 'रुक्मिणीस्वयंवर' या त्यांच्या प्रमुख ग्रंथरचना होय. याशिवाय त्यांनी आध्यात्मिक स्फुट अभंग रचना केल्या तसेच पदे, गौळणी, भारूडे अशी विपुल व विविध प्रकारची रचना केली. त्यांची भारूडे सर्वाधिक लोकप्रिय असून मनोरंजनातून त्यांनी आध्यात्मिक व सामाजिक प्रबोधन केले.

प्रस्तुत भारूड नाथांचे प्रसिद्ध 'भारुड' असून या भारुडात संसारापेक्षा परमार्थ श्रेष्ठ आहे याची जाणीव एका विवाहीत स्त्रीच्या जीवन अनुभवातून व्यक्त केली आहे, संसारिक तापाने त्रस्त झालेली एक स्त्री आपल्या मोडक्या-तोडक्या संसाराचे वर्णन येथे करीत आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य – ईश्वरनिष्ठा)



**मोडकेंसे घर तुटकेसे छप्पर । देवाला देवघर नाही ।।1।।**
**मला दादला नलगे बाई ।।धृ।।**
**फाटकेच लुगडे तुटकीसी चोळी । शिवाया दोरा नाही ।।2।।**
**मला दादला नलगे बाई ।।**
**जोंधळ्याची भाकर आंबाड्याची भाजी । वर तेलाची धार नाही ।।3।।**
**मला दादला नलगे बाई ।।**
**मोडका पलंग तुटकी नवार । नरम बिछाना नाही ।।4।।**
**मला दादला नलगे बाई ।।**
**सुरतीचे मोती गुळधाव सोने । रांज्यात लेणे नाही ।।5।।**
**मला दादला नलगे बाई ।।**
**एका जनार्दनी समरस झाले । तो रस येथे नाही ।।6।।**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ :** दादला – नवरा. लुगडे – साडी. नलगे – लागत नाही. नरम – मऊ. सुरत – सुंदर. गुळधाव – लखलखीत. समरस – ऐक्य.

**टिपा :**

1) भारुड : एक मराठी पद्य वाङमय प्रकार आहे. याद्वारे साध्या रूपकामधून धार्मिक आणि नैतिक तत्त्वज्ञान सर्वसामान्यापर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले जाते.
2) नवार : तीन चार बोटे रुंदीची पुष्कळ लांब असलेली सुती जोडपट्टी.
3) जनार्दन स्वामी : संत एकनाथांचे गुरु.

**भारुडाचा सरळ अर्थ (भावार्थ):**

संत एकनाथांच्या या भारुडात संसारापेक्षा परमार्थ श्रेष्ठ आहे याची जाणीव एका विवाहित स्त्रीच्या जीवन अनुभवातून व्यक्त केली आहे. संसारिक तापाने त्रस्त झालेली एक स्त्री आपल्या मोडक्या तोडक्या संसाराचे वर्णन येथे करत आहे.

आपल्याला राहायला मोडके घर आहे व घराचे छप्पर तुटलेले आहे. या घरात देवासाठी देवघर नाही. तेव्हा नुसताच नवरा घेऊन काय करायचे आहे म्हणून मला दादला नको ग बाई असे विवाहित स्त्री म्हणते. संसार म्हटले म्हणजे घरदार, लुगडी, चोळी, भाकरी-भाजी हे तर हवेच पण आंबाड्याच्या भाजीवर तेलाची धार पाहिजे. मोडका पलंग आणि तुटकी पट्टी नको तर त्या पलंगावर नरम बिछाना पाहिजे. संसारी विवाहितेला सोन्या मोत्याचे दागिने पाहिजेत. परंतु नाथांच्या या नायिकेकडे यातले काहीच नाही. त्यामुळे तिला नवराच नको असे वाटते आहे. नाथांची नायिका आपल्या सद्गुरूशी समरस झाली आहे. तो आध्यात्माचा रस संसारात नाही. या संसारात देवाला स्थान नाही तर कशाला राहावे म्हणून संसार मोडू पाहते आहे आणि सद्गुरूने दिलेल्या नामाने परमार्थाचा संसार उत्तमपणे सार्थ करत आहे. जी अवस्था यातील नायिकेची आहे ती वस्तूतः नाथांची स्वतःची आहे, म्हणून शेवटच्या ओळीत नाथ एका जनार्दनी समरस झाले, असा उच्चार करतात. नाथांच्या भारुडात नेहमीच एक रूपकात्मक अर्थ दडलेला असतो. त्यांची पात्रे सामान्य असली तरी ती गुरुनिष्ठा, ईश्वरनिष्ठा सांभाळून असतात. त्यांना परमार्थ श्रेष्ठ वाटतो. इथेही त्यांची नायिका नवरा नको याचा अर्थ संसारच नको असे म्हणते आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) या भारुडातील स्त्रीला कोण नको आहे?
2) नायिकेच्या घराचे छप्पर कसे आहे?
3) कशावर तेलाची धार नाही?
4) कशा प्रकारचे सोने राज्यात नाही?
5) भाकर कशाची आहे?
6) बिछान्याचे वर्णन कसे केले आहे?
7) संत एकनाथांचे गुरु कोण?

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) भारुड म्हणजे काय ?

2) सुरतेचे मोती गुळधाव सोने या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.

3) आपल्या रोजच्या जेवणाचे वर्णन नायिकेने कसे केले आहे ?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.**

1) या भारुडातील 'स्त्री' मला दादला न लगे बाई असे का म्हणते ?

2) भारुडाचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

**भाषाभ्यास :**

**खालीलपैकी 'अ' गटातील 'ब' गटाशी योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| 1) मोडके | अ) छप्पर |
| 2) तुटके | आ) लुगडे |
| 3) फाटके | इ) घर |
| 4) नरम | ई) नवार |
| | उ) बिछाना |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**समानार्थी शब्द लिहा.**

दादला, लुगडे, देवघर, बिछाना.

**खालील शब्द प्रमाण मराठीत लिहा.**

गुळधाव, सुरत, समरस.

**उपक्रम :**

1) संत एकनाथांचे प्रसिद्ध भारुड 'विंचू चावला' मिळवून वाचा.

2) विविध संतांची छायाचित्रे जमवून माहिती लिहा.

****

# 3. मनाचे श्लोक

**परिचय :** **समर्थ रामदास (जन्म 1608 – मृत्यू 1681)** संत रामदासांचे पूर्ण नाव नारायण सूर्याजी ठोसर होते. हे परमार्थाप्रमाणे प्रपंचाचाही समर्थपणे पुरस्कार करणारे संत कवी. 'दासबोध' हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ. याशिवाय स्तोत्रे, करुणाष्टके, अभंग, मनाचे श्लोक इत्यादी त्यांच्या रचना प्रसिद्ध आहेत. त्यांची भाषा ठसठशीत, नेमकी सुलभ व सुबोध आहे. त्यांचे अनेक श्लोक बोधदायी आहेत.

मानवी मन हे खूप चंचल असते. म्हणून तर त्या चंचल मनाला योग्य मार्गदर्शन करून त्याला योग्य वळण लावण्याचे काम समर्थ रामदास आपल्या मनाच्या श्लोकातून करीत आहेत.

(मूल्य – नैतिक शिकवण)



**मना सज्जना भक्तिपंथेचि जावे ।**
**तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे ।।**
**जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे ।**
**जनी वंद्य ते सर्व भावे करावे ।। 1 ।।**
**मना वासना दुष्ट कामा न ये रे।**

NOT TO BE REPUBLISHED

**मना सर्वथा पापबुद्धि नको रे ।।**
**मना धर्मता नीति सोडू नको हो ।**
**मना अंतरी सार विचार राहो ।। 2 ।।**
**मना पाप संकल्प सोडूनि द्यावा ।**
**मना सत्य संकल्प जीवी धरावा ।।**
**मना कल्पना ते नको वीषयांची।**
**विकारे घडे हो जनी सर्व ची ची ।। 3 ।।**

**शब्दार्थ :** भक्तीपंथेचि - भक्तीमार्गाने. सज्जन - सभ्य. पाविजे - भेटणे, पावणे. वंद्य - आदरणीय. निंदा करणे - दुसऱ्या विषयी वाईट बोलणे. वासना - इच्छा. दुष्ट - वाईट. कामा नये - उपयोगी नाही. सर्वथा - सतत, नेहमी. नीती - चांगले, नियम. सारविचार - मुख्य विचार. अंतरी - मनात. संकल्प - निश्चय. विकार - वासना. ची ची - छी,थू.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**वरील श्लोकाचा सरळ अर्थ :**

1) समर्थ रामदास सांगतात की, नेहमी भक्ती मार्गाचा अवलंब केला तर परमेश्वर आपल्याला प्रसन्न होतो. समाजाविरुद्ध वागल्यास समाजातील लोक आपल्याला नावे ठेवतील, आपली निंदा करतील, असे आपले सर्व वागणे आपण सोडून द्यावे. लोकांना जे जे वंद्य आहे तेच आपण भक्ती भावाने करावे. जी वागणूक निंदनीय आहे त्याचा त्याग करून जी जी चांगली वर्तणूक आहे तीच प्रामाणिकपणे मनोभावे ठेवावी.

2) मनामध्ये दुष्ट वासना ठेवून कधीही चांगले होत नाही. तेव्हा अशी वासना व दुसऱ्याचे वाईट व्हावे अशी पाप बुद्धी ठेवणे योग्य नाही. हेवेदावे मनात जोपासणे चुकीचे आहे. आपली नीतिमत्ता महत्त्वाची आहे. चांगले कोणते वाईट कोणते याचा आपल्या मनाशी नीट सारासार विचार करावा. खरे बोलावे. कुणाला फसवू नये. कोणाचेही नुकसान करू नये.

3) मनात पापी विचार येऊ देऊ नयेत. आलेच तर ते लगेच सोडून द्यावेत. केवळ सत्याचा ध्यास मनात असावा. सदाचाराला सदैव थारा द्यावा. संकल्प म्हणजे

पुढे काय करायचे आहे याचा विचार शुद्ध व सत्याला अनुसरूनच करावा. आपले विचार पापाकडे जाणारे असू नयेत याची जाणीव ठेवावी. विषय वासना व त्यातून होणारे पाप त्यामुळे जनमाणसात आपला अनादर होतो म्हणून अशा विषय वासनाची कल्पनाही मनात आणू नये.

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) कोणत्या मार्गाने जावे असे समर्थ म्हणतात?

2) मनामध्ये कोणती बुद्धी नसावी?

3) अंतरंगामध्ये कोणते विचार असावेत?

4) कोणता संकल्प जीवी धरावा?

5) मनाचे श्लोक कवितेचे मूल्य कोणते?

6) समर्थ रामदासांचे पूर्ण नाव काय?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन – तीन वाक्यात लिहा.**

1) आपल्या मनातील कोणते वाईट विचार सोडून द्यावे असे समर्थ रामदास म्हणतात?

2) कोणत्या चांगल्या विचारांचे आचरण मनात करावे?

3) जगामध्ये अनादर का होतो?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे पाच – सहा वाक्यात लिहा.**

1) समर्थ रामदासांनी सांगितलेल्या तिसऱ्या श्लोकामधील संकल्पाचे वर्णन करा?

2) कवितेतील श्लोकाचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा.

**प्रश्न 4. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

1) मना वासना......... न ये रे

2) मना अंतरी ............ राहो

3) जनी ........ते सर्व ..... करावे

4) मना ...... जीवी धरावा

5) मना कल्पना ते नको......

## भाषाभ्यास :

**खालील ओळीचे गण पाडून वृत्त ओळखा.**

मना सज्जना भक्ति पंथेचि जावे.

**खालील समासाचा विग्रह करून समास ओळखा.**

पापसंकल्प, भक्तीपंथ, सत्यसंकल्प, पापबुद्धी.

**खालील शब्दांचा विग्रह करून संधी सोडवा.**

सज्जन, सदाचार, करुणाष्टके.

## उपक्रम :

1) वामन पंडितांचे 'सुश्लोक' मिळवून वाचा.

2) 'समर्थ रामदासांच्या' श्लोकाचे पठण करा.

****

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 4. निर्झरास

परिचय : बालकवी उर्फ त्र्यंबक बापूजी ठोंबरे (जन्म 1890 मृत्यू 1918) हे मराठीतील एक श्रेष्ठ निसर्गकवी होते. संमेलनाध्यक्ष डॉ. कान्होबा कीर्तीकर यांनी ठोंबरेंना 'बालकवी' ही उपाधी 1907 च्या जळगावातील महाराष्ट्र कवी संमेलनात दिली. रेव्ह. ना. वा. टिळक व लक्ष्मीबाई टिळक बालकवींना 'आपले मानसपुत्र' मानत. 'फुलराणी', 'बालकवींच्या निवडक कविता', 'समग्र बालकवी', इत्यादी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. बालकवींना अवघे 28 वर्षांचे आयुष्य लाभले.

प्रस्तुत कवितेत बालकवीना एक निर्झर दिसला. त्याचे वर्णन एखादे चित्र काढावे तसे केले आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य – निसर्गप्रेम)



गिरिशिखरे, वनमालाही
दरीदरी घुमवित येई !
कड्यावरुनि घेऊन उड्या,
खेळ लतावलयी फुगड्या.
घे लोळण खडकावरती,
फिर गरगर अंगाभवती;
जा हळुहळू वळसे घेत,
लपत छपत हिरवाळीत.
पाचूची हिरवी राने,
झुलव गडे, झुळझुळ गाणे !
वसंतमंडप–वनराई,
आंब्याची पुढती येई.
श्रमलासी खेळुनि खेळ,
नीज सुखे क्षणभर बाळ !
ही पुढचीं पिवळी शेते,
सळसळती – गाती गीते;
झोप कोठुनी तुला तरी,
हांस लाडक्या ! नाच करीं.
बालझरा तू बालगुणी,
बाल्यचि रे ! भरिसी भुवनी !

**शब्दार्थ :** निर्झर – झरा. गिरीशिखरे – डोंगराची टोके. लतावलयी – वेली झाडे यांच्याबरोबर. फुगडी – मुलींचा एक खेळ. खडक – दगड, कातळ. पाचू – अंगठीत घालण्याचा खडा. झुलवणे – झोका देणे. वनराई – वनातील बाग. नीज – झोप. श्रमणे – दमणे. पिवळी शेते – पिवळ्या फुलांची शेते, मोहरीची शेते, गीते – गाणी. लाडका – आवडता, प्रिय. भुवन – घर, सदन. भरिसी – भरणे, व्यापणे.

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**टिपा :**

1) वनमाला - वनातील फुलांचे हार, दरी - दोन डोंगरांच्या मधील खोलगट भाग.

2) वसंतमंडप - वसंत ऋतूत हिरव्यागार पानाने सजलेला मंडप.

**कवितेचा सरळ अर्थ :** बालकवींना एक निर्झर दिसला. त्याचे वर्णन एखादे चित्र काढावे तसे कवीने केले आहे. हे निर्झरा तू पर्वत, शिखरे ,लता वेली यांनी भरलेल्या दऱ्यातून घुमवित येत आहेस. कड्यावरून उड्या घेत, लता वेलीशी फुगड्या खेळत, खडकावरून लोळण घेत, स्वतःच्या अंगाभोवती गरगर फिरत, हळूहळू वळसे घेत, हिरवळीतून लपत - छपत येत आहेस. पुढे आल्यानंतर त्याला पाचुची हिरवी राने लागतात. पाचू हा दागिन्यात वापरण्यात येणारा हिरव्या रंगाचा हिरा असतो. राने हिरवीगार आहेत, म्हणून हिरव्या रानांना पाचूची राने म्हटले आहे. ही पाचुची राने झुलवीत, बागडत, झुळझुळ अशी गाणी गात झरा पुढे जातो. पुढे त्याला हिरव्या वनराईचा मंडप लागतो. त्यानंतर निर्झर आंब्याच्या हिरव्यागार बागेतून पुढे जातो. पुढे झऱ्याला पिवळ्या रंगाची फुले असणारी शेती सळसळत गाणी गातांना दिसतात. त्याच्याबरोबर नाचत खेळत आला आहेस. त्यामुळे तू दमला असशील तर थोडा विसावा घेण्यासाठी थोडा वेळ सुखाने झोप घे, पण तुला झोप येणार नाही, कारण तुझ्याजवळ बालकाचा अवखळपणा, बालिशपणा, खेळकरपणा हे गुण आहेत. या गुणांनी तू हसत नाच कर, तसेच तुझे हे आनंदी करणारे गुण या जगात, या भुवनात भरून सोड असे कवी म्हणतो.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) दरी दरी कोण घुमवित येतो ?

2) निर्झर कशावरून उड्या घेत आहे ?

3) लतावेली कोणता खेळ खेळत आहेत ?

4) हिरवी राने कशाची आहेत ?

5) शेती कोणत्या रंगाची आहे ?

6) निर्झरात कोणते गुण आहेत ?

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन – तीन वाक्यात लिहा.**

1) निर्झर कोठून कसा येतो ?

2) क्षणभर सुखाने झोप असे कोणाला, का म्हटले आहे ?

3) वनराईनंतर कोणती शेते येतात ? ती काय करतात ?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे पाच – सहा वाक्यात लिहा.**

1) 'पाचूची हिरवी राने' या कल्पनेचा विस्तार करा ?

2) 'बालझरा तू बालगुणी बाल्यची रे भरीसी भुवनी' या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.

3) 'निर्झर' या कवितेचा आशय स्पष्ट सांगा.

4) 'निर्झरास' या शीर्षकाचा अर्थ स्पष्ट करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**भाषाभ्यास :**

**खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

निर्झर, खडक, पाचू, श्रमणे, भुवन, गीते.

**खालील समासाचा विग्रह करून समास ओळखा.**

वसंतमंडप, वनराई, वनमाला

**उपक्रम :**

1) बालकवीच्या 'औदुंबर' या निसर्गकवितेचे सामूहिकरीत्या वाचन किंवा गायन करा.

2) निसर्गकवितांचे संकलन करून शाळेत निसर्गकवितांचे प्रदर्शन भरवा.

****

# 5. थरकू नको

**परिचय :** **नारायण गंगाराम सुर्वे (जन्म–1926, मृत्यू–2010)** जनसामान्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे कवी. साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना 1998 चा 'पद्मश्री' हा पुरस्कार देण्यात आला. मार्क्सवादी विचारांचा पगडा त्यांच्यावर होता. तसा तो कवितेतूनही दिसतो. समाज परिवर्तनाची कवने त्यांनी लिहिली आहेत. त्यांचे 'ऐसा गा मी ब्रम्ह', 'जाहीरनामा', नव्या माणसाचे आगमन', 'माझे विद्यापीठ', सनद', 'पुन्हा एकदा कविता', इत्यादी काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. दलित कवितेचा चेहरा मोहरा बदलून या प्रवाहाला सशक्त आणि समृद्ध करण्याचे कार्य कवीने केले आहे.

प्रस्तुत कवितेतून कवी स्वत:च्या पत्नीला समाजात वावरताना समाजकंटकापासून सावध राहण्याचा इशारा देत आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**(मूल्य – जीवन वास्तव)**



**आवडीने रांधलेला भात**
**खावयास मी नसेन घरात**
**उद्याचे नवे रचाया बेत**
**मी हजर असेन सभेत**
**उपाशीच वाट पाहू नको –**
**ताऱ्यांनी भिजे उत्तररात्र**
**शहारे तुझे तरुण गात्र**
**याचं क्षणी मी गर्दीत मात्र**
**रंगवीत असतो भूईपत्र**
**सरते प्रहर मोजू नको –**
**कधीतरी राक्षस येतील**
**आपुले दार ठोठावतील**
**घराची झडतीहि घेतील**
**कदाचित् तुलाहि नेतील**
**क्षणभरहि थरकू नको –**

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**शब्दार्थ :** रांधणे – शिजविणे, तयार करणे. रचाया – आखण्यासाठी. बेत – योजना. उत्तररात्र – पहाट. शहारणे – रोमांचित होणे. गात्र – शरीर. भुईपत्र – जमिनीवरती केलेले लेखन. सरते – संपते. प्रहर – तीन तासांचा काळ. राक्षस – दुष्ट माणसे. ठोठावणे – वाजविणे, दारावर थाप मारणे. झडती – तपास, शोध. थरकणे – घाबरणे, भीणे. तारे – चांदण्या, रात्री आकाशात चमचमणारे प्रकाश पुंज.

**कवितेचा सरळ अर्थ (भावार्थ):**

नारायण सुर्वे यांनी आयुष्यभर सामाजिक कार्यकर्ता म्हणून काम केले. पक्षाचे काम करीत असताना त्यांना वेळोवेळी, रात्री – अपरात्री कामासाठी घराबाहेर जावे लागे. पोस्टर लावणे, पत्रके वाटणे, सभांचे आयोजन करणे, प्रसंगी सभेत भाषण करणे, ही सारी कामे त्यांना करावी लागत. अनेकदा पोलिसांचा ससेमिराही मागे लागे, दंडुके खावे लागत. पोलीस व अधिकारी लोक त्यांना शोधत घरापर्यंत येत.

घरातील बायका मुलांना वेठीस धरत. घराबाहेर खेचत. पत्नीसही याची जाणीव सुर्व्यांनी करून दिली होती. त्या सुर्व्यांना त्यांच्या कामात मदत करीत असत. असा त्यांचा संसार चालला होता. माणसाचा अनुभवच त्याच्या साहित्याला समृद्ध करीत असतो. कवीचे जगणे आणि त्याचे काव्य हे एकरूप असावे लागते. सुर्वे हे असे एक कवी आहेत की, मी जसा जगलो आहे तसाच मी कवितेत आहे. असे ते म्हणतात.

'थरकू नको' या कवितेतही कवीने आपले हेच सारे अनुभव मांडले आहेत आणि पत्नीला असे बजावले आहे की, मी जेवायला घरात नसेन तेंव्हा तू उपाशी राहू नको, मी सभेत भाषण करत असेन, सभा ऐकत असेन, कधी रात्री मी रस्त्यावर जाहिराती चिकटवत असेन, पक्षांच्या कार्याची माहिती रंगवत असेन. तेंव्हा तू माझी वाट पाहू नकोस, रात्रीचे प्रहर मोजू नकोस, काळजी करू नकोस. आमचे विरोधक कधी दार ठोठावतील, पोलीस येतील, तुला घराबाहेर खेचतील, त्रास देतील, पण क्षणभरही थरकू नकोस. धीटपणे याही प्रसंगाला तुला सामोरे जावे लागणार आहे.

पती-पत्नीच्या नात्यावर मराठीत लिहिल्या गेलेल्या कवितेपेक्षा सूर्व्यांची कविता अधिक सकस आणि समृद्ध आहे. ती प्रौढ आणि समंजसही आहे. प्रेमाचा खरा अर्थ त्यांना कळला आहे. स्त्री-पुरुषातील खरी समानता ते जाणतात. म्हणून कार्यकर्त्यांच्या पत्नीने त्यांच्या मागे कसे राहावे, कसे धीट व समाजाभिमुख व्हावे याचे मार्गदर्शन ते करताना दिसतात.

या कवितेतला नायक सुर्वे स्वतःच आहेत आणि आपल्या पत्नीस ते संबोधन करीत आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) खाण्याच्यावेळी कवितेचा नायक कोठे असेल?

2) उत्तर रात्री कवितेच्या नायिकेची अवस्था कशी असणार आहे?

3) उत्तर रात्री कवितेचा नायक काय करीत असे?

4) राक्षस कोणास म्हटले आहे?

5) दार कोण ठोठावतील?

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) कवितेचा नायक सभेत जाऊन काय करणार आहे?

2) कवी गर्दीत जाऊन काय करणार आहे?

3) पत्नीने केंव्हा थरकू नये असे कवीला वाटते?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.**

1) कवितेचा नायक स्वत:च्या पत्नीला काय सल्ला देतो?

2) 'थरकू नको' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

3) सुर्व्यांचे सामाजिक भान या कवितेतून कसे स्पष्ट होते?

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**भाषाभ्यास :**

**खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**
बेत रचणे, दार ठोठावणे, ससेमीरा लागणे, वेठीस धरणे.

**समानार्थी शब्द लिहा.**
रांधणे, बेत, शहारे, गात्र, भुईपत्रे,

**उपक्रम :**

1) 'कवी शब्दांचे ईश्वर' या मालिकेचा भाग क्रमांक सातवा शिक्षकांची मदत मिळवून पहा.

2) 'नारायण गंगाराम सुर्वे' हा जीवनपट चित्रफितीच्या माध्यमातून पहा.

****

# विभक्तीचे प्रकार

✻ नामाच्या रूपात जो बदल होतो तो 1) लिंगभेदामुळे व 2) वचनभेदामुळे हे आपण पाहिले. नामाच्या रूपात विभक्तीमुळेही बदल होतो. विभक्ती कशास म्हणतात ते पाहू :

✻ प्रत्येक वाक्य हे एका कुटुंबासारखे आहे. कुटुंबात आई, बाप, भाऊ, बहीण, पती, पत्नी, मुलगा, मुलगी अशा विविध नात्यांची काही माणसे एकत्र येतात. कुटुंबात एक प्रमुख व्यक्ती असते. या प्रमुख व्यक्तीशी त्या कुटुंबातील इतर व्यक्तींचे प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष असे नाते असते. हीच गोष्ट वाक्यातही पाहावयास मिळते. वाक्यातील शब्दांचा त्यातील मुख्य शब्दाशी म्हणजे क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी काही ना काही संबंध असतो. या संबंधाला व्याकरणात 'कारक' असे म्हणतात.

✻ वाक्यात जे शब्द येतात ते त्यांच्या मूळ स्वरूपात जसेच्या तसे सामान्यतः येत नाहीत. वाक्यात वापरताना त्यांच्या स्वरूपात बदल करावा लागतो. उदाहरणार्थ – 'शेजारी मधू रस्ता कुत्रा काठी मार' असे शब्द एकापुढे एक ठेवल्याने काहीच बोध होत नाही. या शब्दसमूहाला वाक्य म्हणता येत नाही. ते वाक्य होण्यासाठी 'शेजारच्या मधूने रस्त्यात कुत्र्याला काठीने मारले.' अशा स्वरूपात ते शब्द ठेवावयास हवेत. वाक्यातील शब्दांचा संबंध दाखविण्यासाठी नाम किंवा सर्वनाम यांच्या स्वरूपात जो बदल किंवा विकार होतो त्याला व्याकरणात 'विभक्ती' असे म्हणतात.

✻ **विभक्तीची व्याख्या अशी : नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांनी दाखविले जातात त्या विकारांना 'विभक्ती' असे म्हणतात.**

✻ नामाचे किंवा सर्वनामाचे विभक्तीचे रूप तयार करण्यास त्याला जी अक्षरे जोडतात त्यास 'प्रत्यय' असे म्हणतात. वरील वाक्यात 'च्या, ने, त, ला' हे विभक्तीचे प्रत्यय होत. हे विभक्तीचे प्रत्यय लावण्यापूर्वी नामाच्या किंवा

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

सर्वनामाच्या स्वरूपात जो बदल होतो त्याला 'सामान्यरूप' असे म्हणतात. 'रस्त्या' व 'कुत्र्या' ही रस्ता व कुत्रा या नामांची सामान्यरूपे होत व 'रस्त्यात, कुत्र्याला' ही विभक्तीची रूपे होत.

* प्रत्येक वाक्य म्हणजे एक विधान असते. यात क्रियापद हा प्रमुख शब्द होय. ही क्रिया करणारा वाक्यात कोणीतरी असतो. त्याला 'कर्ता' असे म्हणतात. ही क्रिया कोणावर घडली ? कोणी केली ? कशाने केली ? कोणासाठी केली ? कोठून घडली ? कोठे किंवा केव्हा घडली ? हे सांगणारे शब्द वाक्यात असतात. नामांचा क्रियापदांशी किंवा इतर शब्दांशी असणारा संबंध अशा आठ प्रकारचा असतो; म्हणून विभक्तीचे एकंदर आठ प्रकार मानले जातात. ते असे- (1) प्रथमा, (2) द्वितीया, (3) तृतीया, (4) चतुर्थी, (5) पंचमी, (6) षष्ठी, (7) सप्तमी, (8) संबोधन.

* यातील पहिल्या सातांना संस्कृतातील नावे दिली आहेत. आठव्या संबंधाच्या वेळी हाक मारली जाते म्हणून त्याला 'अष्टमी' असे न म्हणता 'संबोधन' असे नाव दिले आहे. (संबोधन - हाक मारणे, बोलावणे.)

* या विभक्तींचे प्रत्यय कोणते व त्यामुळे नामाच्या स्वरूपात कोणते बदल होतात. हे पुढील तक्त्यावरून दिसून येईत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## विभक्तीचे प्रत्यय व 'फूल' या नामाची होणारी रूपे

| विभक्ती | एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|---|
| | प्रत्यय | शब्दांची रूपे | प्रत्यय | शब्दांची रूपे |
| प्रथमा | ------ | फूल | ---- | फुले |
| द्वितीया | स, ला, ते | फुलास, फुलाला | स, ला, ना. ते | फुलांस, फुलांना |
| तृतीया | ने, ए, शी | फुलाने, फुलाशी | नी, शी, ई, ही | फुलांनी, फुलांशी |
| चतुर्थी | स, ला, ते | फुलास, फुलाला | स, ला, ना, ते | फुलांस, फुलांना |
| पंचमी | ऊन, हुन | फुलाहून | ऊन, हुन | फुलांहून |
| षष्ठी | चा, ची, चे | फुलाचा-ची-चे | चा, ची, चे, च्या | फुलांचा-चा-चे |
| सप्तमी | त, ई,आ | फुलात | त, ई, आ | फुला |
| संबोधन | ---- | ------ | फुलांनो | नो |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**खालील वाक्ये वाचून अधोरेखित शब्दांच्या विभक्ती ओळखा.**

1. मुलांनी आज्ञा पाळावी.
2. बाबांना दुसरीकडे जेवायला जाण्याचा फार कंटाळा असे.
3. जपानचे आणि जपान्यांचे बाबांना अपरंपार कौतुक होते.
4. शेजारच्या मधूने रस्त्यात कुत्र्याला काठीने मारले.
5. ही वस्तू मी इंग्लंडहून आणली.
6. शिक्षकांनी मुलांना शाबासकी दिली.

## विभक्तीची वैशिष्ट्ये

नामांना व सर्वनामांना प्रत्यय लागून विभक्तीची रूपे तयार होतात.

ही रूपे क्रियापद व इतर शब्द यांच्यातील संबंधांशी निगडित असतात.

**लक्षात ठेवा :** (अ) नामाचे किंवा सर्वनामाचे विभक्तीचे रूप तयार करण्यासाठी त्यांच्यापुढे जी अक्षरे जोडली जातात, त्यांना '**प्रत्यय**' असे म्हणतात.

(आ) विभक्तीचे प्रत्यय लागण्यापूर्वी नामाच्या किंवा सर्वनामाच्या मूळ रूपात जो बदल होतो, त्याला '**सामान्यरूप**' म्हणतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# भाषेचे अलंकार

आपण बोलताना किंवा लिहिताना आपले म्हणणे इतरांना प्रभावी रीतीने सांगतो. तसेच ते सुंदर रीतीनेही सांगावे असा आपला प्रयत्न असतो. आपले म्हणणे सुंदर रीतीने सांगताना अलंकारांची सहज रचना होते, तेव्हा भाषा सुंदर होते. कवी आपली अभिव्यक्ती सुंदर व्हावी म्हणून असे अनेक अलंकार वापरतात.

'अलंकार' या शब्दाचा अर्थ 'दागिना' असा आहे. दागिने घातल्यावर माणसाच्या शरीराला शोभा येते. त्याच्या सौंदर्यात भर पडते. दागिन्याप्रमाणे तलम, रंगीबेरंगी कपड्यांनी कोणाच्या शरीराला शोभा येते, तर कोणाचा चेहरा चष्म्यामुळे शोभून दिसतो. सुंदर कपडे, चष्मा हे देखील एक अर्थाने अलंकारच आहेत. अलंकारात शरीराला शोभा आणण्याचा धर्म असतो.

जी गोष्ट व्यक्तीची तीच भाषेची. आपली भाषा अधिक परिणामकारक किंवा चांगली दिसावी म्हणून आपली नेहमीची साधी भाषा न वापरता आपण वेगळ्याच पद्धतीने सांगून ती अधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न करतो. 'तुझे चालणे मोहक आहे.' असे न म्हणता, 'चांदणे शिंपीत जाशी चालता तू चंचले' अशी शब्दरचना कवीने केल्यामुळे तीच कल्पना अधिक उठावदार वाटते व या चरणातील 'च' हे अक्षर वारंवार आल्यामुळे हे वाक्यही कानाला गोड वाटते.

माणसांच्या आयुष्यात सुखापेक्षा दुःखच अधिक असते ही साधी कल्पना कवीने कशा चमत्कृतिपूर्ण रीतीने मांडली आहे पाहा.

**एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे ।**
**जरतारी हे वस्त्र मानवा तुझिया आयुष्याचे ।।**

आयुष्याला वस्त्र कल्पिल्यामुळे एक साधी कल्पना किती मोहक व अर्थपूर्ण वाटते, नाही? अशा चमत्कृतिपूर्ण रचनेमुळे मनाला आल्हाद वाटतो. भाषेला ज्याच्या-ज्याच्यामुळे शोभा येते त्या गुणधर्मांना 'भाषेचे अलंकार' असे म्हणतात. कधी दोन वस्तूंतील साम्य दाखवून, तर कधी विरोध दाखवून, कधी नाद निर्माण करणारे शब्द वापरून, तर कधी एखादी कल्पना वाजवीपेक्षा अधिक फुगवून सांगून

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

आपण आपली भाषा अधिक सुंदर किंवा पारिणामकारक करण्याचा प्रयत्न करतो. कधी शब्दांतील अक्षररचनेमुळे नाद निर्माण होऊन भाषेला शोभा येते, तर कधी योजिलेल्या शब्दांमुळे अर्थाचे सौंदर्य खुलून दिसते. त्यामुळे.

**भाषेच्या अलंकारांचे दोन प्रकार होतात.**

- 1) शब्दालंकार
  - 1) अनुप्रास
  - 2) यमक
  - 3)श्लेष
- 2) अर्थालंकार.

**यातील शब्दालंकारांची ओळख करून घेऊ.**

**1) अनुप्रास – पुढील कवितेच्या ओळी वाचा :**

गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले,
शीतलतनु चपलचरण अनिल गण निघाले
रजतनील, ताम्रनील
स्थिर पल जल पल सलील
हिरव्या तटि नावांचा कृष्ण मेळ खेळे.

* वरील ओळी वाचताना ‘ल’ हे अक्षर पुन:पुन्हा आल्यामुळे जो नाद निर्माण होतो.त्यामुळे या काव्यपंक्तीला शोभा आली आहे. अशा रीतीने, एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात **एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा त्याला सौंदर्य प्राप्त होते तेव्हा ‘अनुप्रास’ हा अलंकार होतो.**

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

आणखी काही उदाहरणे :-

1) पेटविले पाषाण पठरावरती शिवबांनी । गळ्यामध्ये गरिबाच्या गाजे संतांची वाणी ।

2) संत म्हणति, 'सप्त पदें सहवासे सख्य साधुशी घडते ।

## 2) यमक – खालील चरण वाचा :

* जाणावा तो ज्ञानी । पूर्ण समाधानी । निःसंदेह मनी । सर्वकाळ ।।
* यातील पहिल्या तीन चरणांच्या शेवटी 'नी' हे अक्षर आलेले आहे. तसेच,
* राज्य गादीवरी । काढी तुझ्या आठवणी
* फळा आली माय । मायेची पाठवणी.

* यातील दुसऱ्या व चवथ्या चरणांच्या शेवटी 'आठवणी' व 'पाठवणी' ही चार अक्षरे क्रमाने आल्यामुळे ऐकताना गंमत वाटते. अशा प्रकारे, कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठराविक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे वेगळ्या अर्थाने आल्यास 'यमक' हा अलंकार होतो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

यमकाची आणखी काही उदाहरणे –

1) सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो ।
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो

2) आला वसंत कविकोकिल हाही आला ।
आलापितो सुचवितो अरुणोदयाला ।

अनुप्रासात जशी अक्षरांची पुनरावृत्ती असते तशी यमकातही असते. अनुप्रासात वर्णाची ही आवृत्ती कोठेही असू शकते पण यमकात ही आवृत्ती ठराविक ठिकाणीच होत असते. पद्यातील चरणाच्या शेवटी, मध्ये, किंवा ठराविक ठिकाणी.

### 3) श्लेष : पुढील वाक्ये वाचा :

- गोविंदराव : – काय वसंतराव, तुम्हांला सुपारी लागते का?
- वसंतराव : हो, हो लागते ना!
- गोविंदराव : जर लागते, तर का खाता?

- या संवादात 'लागते' या शब्दाच्या दोन अर्थांनी दोघेही बोलत असल्यामुळे थोडी गंमत घडते.
- 'लागणे' या शब्दाचे दोन अर्थ होतात. 1) हवी असणे, 2) खाल्ल्याने भोवळ किंवा चक्कर येणे.
- अशा रीतीने एकच शब्द वाक्यात दोन अर्थांनी वापरल्यामुळे जेव्हा शब्दचमत्कृती साधते तेव्हा 'श्लेष' हा अलंकार होतो.
- 'श्लेष' या शब्दाचा अर्थ आलिंगणे, एकत्र मिसळणे, असा आहे. (श्लेष आलिंगन, मिठी) एकाच शब्दाला दोन अर्थांची मिठी असते म्हणजे दोन अर्थ चिकटलेले असतात. त्यामुळे एका शब्दाचे दोन अर्थ निघतात. श्लेष हा शब्दालंकार आहे व अर्थालंकारही आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**पुढील वाक्ये पाहा:**

1) श्रीकृष्ण नवरा मी नवरी ।
   शिशुपाल नवरा मी न-वरी

2) कुस्करू नका ही सुमने ।
   जरी वास नसे तिळ यांस, तरी तुम्हांस अर्पिली सु-मने ।।

3) ते शीतलोपचारे जागी झाली हळूच मग बोले ।
   औषध न लगे मजला, परिसुनि माता बरे म्हणुनि डोले ।।

- वरील पद्यपंक्तीतील (1) नवरी, न-वरी (2) सुमने, सु-मने (3) नलगे, न-लगे, अशा रीतीने त्या त्या शब्दांची फोड केल्यानंतर दोन अर्थ कळून येतात. या प्रकारच्या श्लेषाला 'सभंग श्लेष' व एकच शब्द जसाच्या तसा ठेवून त्याचे जेव्हा दोन अर्थ संभवतात त्यास 'अभंग श्लेष' म्हणतात.

**खालील उदाहरणे वाचून अलंकार ओळखा.**

1) रती रंगी रंग ध्यान रंगवीत रंगा

2) पेटवले पाषाण पठारावरती शिवबांनी
गळ्यामध्ये गरीबांच्या गाजे संतांची वाणी

3) जाणावा तो ज्ञानी । पूर्ण समाधानी ।।
निसंदेह मनी । सर्वकाळ ।।

4) राज्य गादीवरी । कधी तुझ्या आठवणी ।।
फळा आली माय । मायेची पाठवणी ।।

5) गाडी जावयाची आहे.

6) कोल्हापुरात गेला.

****

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# शब्द समुहाबद्दल एक शब्द

आपण बोलताना अनेकदा शब्दांची काटकसरही करत असतो. म्हणजे एखादा असा शब्द वापरतो की ज्यामधून अनेक शब्दांनी व्यक्त होणारा, प्रकटणारा आशय सांगितला जातो. उदा. गाणारा, चित्रे काढणारा, शिल्पे बनवणारा, नृत्यकला अंगी असणारा, अगदी नकला करणारा माणूस असला की आपण सहजपणे त्याचा उल्लेख 'कलावंत' किंवा 'कलाकार' असा करतो. अशाच पद्धतीने कितीतरी शब्द आपण वापरत असतो. त्यामुळे भाषेला सौंदर्य प्राप्त होते, नेमकेपणा येतो. अशा शब्दसमूहाबद्दल येणाऱ्या शब्दांची यादी पुढे दिली आहे.

1) अंगचोर – अंग राखून काम करणारा, कामचुकार.

2) अनमोल – ज्याची किंमत होऊ शकणार नाही असे.

3) अफवा – खोडसाळपणे पसरवलेली खोटी बातमी.

4) अजिंक्य – कधीही न पराभूत न होणारा.

5) अजातशत्रू – ज्यास कोणीही शत्रू नाही असा.

6) अल्पसंतुष्ट – थोडक्यात समाधान मानणारा.

7) अभूतपूर्व – पूर्वी कधीही न घडलेला.

8) आत्मवृत्त – आपली हकिकत स्वतःच निवेदन करणे.

9) उदयोन्मुख – उदयाला येत असलेला.

10) उभयचर – जमिनीवर आणि पाण्यात राहू शकणारा.

11) उत्तरायण – सूर्याचे उत्तरेकडे जाणे.

12) ऐतखाऊ – कामधंदा न करता दुसऱ्याच्या जिवावर जगणारा.

13) कर्णमधुर – कानास गोड लागणारे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

14) कनवाळू - दुसऱ्याचे दुःख पाहून कळवळणारा.

15) काव्यगायन - कविता तालासुरात गाऊन दाखविणे.

16) कोंडवाडा - मोकाट जनावरांना कोंडून ठेवण्याचे ठिकाण.

17) खग- आकाशात गमन करणारा, पक्षी.

18) गर्भश्रीमंत - जन्मापासून मुबलक संपत्ती जवळ असणारा.

19) गायरान - गाईला चरण्यासाठी राखलेले रान.

20) घरभेदी - शत्रूला सामील झालेला / फितूर घरात भांडणे लावणारा.

21) दीपस्तंभ - जहाजांना दिशा दाखविणारा मनोऱ्यावरील दिवा.

22) नभोवाणी - आकाशवाणी, आकाशातून ऐकू येणारी वाणी किंवा संदेश

23) निर्वासित - घरादारास व देशास पारखा झालेला.

24) दंतकथा - एकाने दुसऱ्यास सांगून चालत आलेली गोष्ट.

25) निःपक्षपाती - कोणत्याही पक्षाची बाजू न घेणारा.

****

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पूरक वाचन

## 1) गर्वाचा परिणाम

मनुष्याला गर्व फार असतो. ते फार वाईट. गर्वाला व्याज नसते. ह्याच्यामुळे अनेक अपराध घडतात. गर्वाने लोक इतरांना उद्धटपणे बोलतात, मारहाण करतात. त्यांच्या अंगावर धावून जाऊन त्यांना तोंडाला येईल तसे बोलतात.त्यांना लहान – थोर याची जाणीव नसते. कोणाशी कसे बोलावे हे गर्वामुळे त्यांना समजत नाही. आपल्यावर कोणी उपकार केले आहेत याची जाणीवच त्यांना राहात नाही. गर्वामुळे ते पीठ व राख समान लेखतात.

गर्वामुळे माणसाने केलेल्या अपराधाचा भोग त्याला सुटत नाही. हा ज्याप्रमाणे इतरांवर गर्व करतो, त्याचप्रमाणे इतरही त्याच्याशी गर्वाने वागतात. त्याच्याशी बोलत देखील नाहीत. त्याला एखाद्या जुन्या खेटराप्रमाणे लेखतात. तो बोलू लागला तरी ते त्याच्याशी बोलत नाहीत.

ज्या वस्तुमुळे गर्व आलेला असतो त्या वस्तुचा विनाशकाल आला असे समजावे. स्त्री, धन, जमीन यांच्यामुळे, मुले द्रव्य विद्या यांच्यामुळे, तसेच शक्ती इत्यादीमुळे गर्व आला तर ते सर्व जातील. आपल्याला नसल्याप्रमाणे होतील. राजाला गर्व झाल्यास राज्य जाईल. गरिबाला गर्व आल्यास त्याला भिक्षा मिळणार नाही. याप्रमाणे आपण गर्व केला तर देव आपली मस्ती जिरवितो. याचप्रमाणे निर्गुणातही सहसा गर्व करू नये. त्यामुळे ते (निर्गुण) कमी होते गमावण्यास कबूल असणाऱ्यांनी गर्व करावा.

याकरिता गर्व आल्यास आपल्यापेक्षा जे थोर आहेत, त्यांचा दाखला घ्यावा. एवढे असलेल्यांना गर्व नाही, मग मला का गर्व असावा ? असे मनाला सांगून, त्याचप्रमाणे गर्वामुळे असलेलेही टिकणार नाही म्हणून भिऊन गर्वाचा अंकुरदेखील येऊ देऊ नये. आल्यास त्या क्षणीच तो खुडून टाकावा. देवाने आपणास दिलेले सांभाळून, पुरवून खावे. आड करून संतोषाने असावे.

## 2) अभंग

कन्या सासुऱ्यासी जाये । मागे परतोनी पाहे ।। 1 ।।
तैसे झाले माझ्या जिवा । केंव्हा भेटसी केशवा ।। 2 ।।

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

चुकलिया माय। बाळ हुरहूर पाहे ।। 3 ।।

जीवना वेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ।। 4 ।।

अभंगाचा सरळ अर्थ : कन्या सासरी गेली तरी तिची माहेरची ओढ कमी होत नाही. लग्न झालेली मुलगी पुन्हा पुन्हा मागे वळून पाहते. तिचा जीव माहेरच्या माणसांसाठी, घरातील माणसांसाठी तळमळतो. तुकाराम महाराज म्हणतात, सासरी जाणाऱ्या कन्येप्रमाणे माझी अवस्था झाली आहे. सासरी जाणाऱ्या मुलीला आई वडील व भावंडांची जशी, ओढ लागते तशी, तुकाराम महाराजांना केशवाची ओढ लागली आहे.

आई आणि बाळ यांची चुकामुक झाली की, तेव्हा ते बाळ घाबरून आईला शोधू लागते. इकडे तिकडे पाहू लागते. तशी तुकाराम महाराजांची केशवाशिवाय, विठ्ठलाशिवाय अवस्था झाली आहे. प्रत्येक ठिकाणी विठ्ठलाला माय व आपण त्याचे मूल समजतात. तुकोबा म्हणतात, पाण्यातून बाहेर काढलेल्या मासोळी प्रमाणे मी विठ्ठलासाठी तडफडत आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## 3) खडीसाखरेचा खडा

काका आणि काकू हे एक प्रेमळ जोडपे शांतारामाच्या चाळीत तीस वर्षांपासून एकाच बिऱ्हाडात राहात असे. उतारवय झाले तरी दोघांच्या संसारात तिसऱ्या जिवाची भर पडली नव्हती. मग मुले होऊन ती गेली की झालीच नाहीत, ते मला माहीत नाही. काकांचा भाऊ अहमदाबादेस राहात असे. त्याची मुलगी रेवा ही मुंबईसच दिलेली होती, तिला चार-पाच मुले होती. रेवा वारंवार आपल्या मुलांना घेऊन काकांच्या बिऱ्हाडी येत असे. कधी कधी राहातही असे. एखादे वेळी मुले रात्री स्वतःच्या घरी परत न जाता काकांच्या घरी मोठ्या खुषीने राहात असत.

कारण घरच्यापेक्षा आजोळीच त्यांचे लाड जास्त होत असत. काका आजोबा त्यांना बोलपट पहाण्यास घेऊन जात. बोलपटानंतर त्यांना उपहार-गृहात नेऊन थंड पेये आणि चमचमीत खाद्ये यांचा पुरवठा करीत. काकू त्यांना जेवताना गोड गोड पदार्थ वाढी आणि खेळणी घेऊन देई. तेव्हा त्या मुलांना काका-आजोबांचा आणि काका-आजीचा लळा लागावा यात काहीच नवल नाही.

तथापि या नातवंडांनी मधूनच यावे, आपल्याला लुबाडावे आणि सकाळी घरी परत जावे, ह्या योगे त्या वृद्ध दांपत्यास समाधान वाटेना. विशेषतः काकू-आज़ीस वाटू लागले की, यांतली एखादी मुलगी आपण स्वतःच्या मुलीप्रमाणे लहानाची मोठी करावी. पुढे आपल्या खर्चाने तिचे लग्न ही करून द्यावे, म्हणजे म्हातारपणी दुर्बलतेचा काळ घालविण्यास एखादे मायेचे आणि हक्काचे ठिकाण होईल. इतक्या पुढचे कोणी पाहिले आहे म्हणा ! निदान सध्या तरी घरात एकसारखी गडबड करणारे, सांडलवंड करणारे मूल घरात असले तर घराची चैतन्यहीन उदासीनता नष्ट होईल.

पतीची संमती काकुंनी तत्काळ मिळविली. काकू रेवाच्या घरी गेल्या आणि रेवा व तिचे यजमान रेवादास यास त्यानी आपला विचार कळविला. रेवाचे एखादे मूल आजोळी राहण्यास गेल्याने तिचा संसार सुना भासणार नव्हता. इतकेच नव्हे आपल्या एका मुलीस अधिक चैनीत आणि थाटात राहण्याची संधी मिळत आहे असे पाहून त्या दोघांस समाधानच वाटले.

रेवाची तीन वर्षाची मुलगी नबू (नर्मदा) ही फारच गोड आणि हुशार होती. इतकी लहान असून बोबडे मुळीच बोलत नसे. काकू-आजीच्यावर आणि काका-आजोबांच्यावर तिची छाप विशेष बसलेली होती. तिलाच घेऊन जाण्याचे काकूंनी ठरविले आणि लगेच नबूची संमती मिळाली. तिचे चिमुकले कपडे आणि खेळणी एका पिशवीत ठेवण्यात आली आणि तिला घेऊन काकु आपल्या बिऱ्हाडी आल्या. नबूने रात्री आईची आठवण काढली नाही. दोन चार दिवसांनी आई भेटतच असे, त्यामुळे दोघींना जड वाटले नाही. नबू आल्यानंतर थोड्याच दिवसांत काकांच्या बिऱ्हाडात बदल दिसून आला. दोन खाटांच्यामध्ये एक चिमुकली खाट आली. भिंतीवर रंगीत चित्रे टांगण्यात आली. एका दोरीवर लहान लहान झगे वाळू लागले. कपड्याच्या कपाटातील कापडांची जागा वेगवेगळया खेळण्यांनी घेतली आणि घरभर चित्रांची पुस्तके, चित्रे, बोळकी, शंख, शिंपले इत्यादिकांचा पसारा दिसू लागला. लहानसा रंगीत पाट, चिमुकली ताटली आणि बारीक लोटीभांडे यांची स्वयंपाकघरातील सामानात भर पडली. ज्या बिऱ्हाडाजवळ म्हाताऱ्या कोताऱ्यावाचून कोणी सहसा फिरकत नसे, तिकडे चाळीतील मुलामुलीच्या टोळया धावपळ करू लागल्या. नबुला खेळण्यासाठी एक स्पॅनियल जातीचे पिल्लूही काकांनी खरेदी केले. ते पाहून काकूंनी एक दाट केसांचे गुबगुबीत मांजर आणून ठेविले.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

एवढ्या गडबडीत रेवादासांची बदली सिकंदराबादेस झाली. बिऱ्हाडास सरकारी जागा मिळाल्याने तो सहकुटुंब तिकडे गेला. नबु आजा-आजीजवळ लाडात आणि थाटात आनंदाने राहात आहे असे पाहून त्यांनी तिला मुंबईसच राहू देण्याचे ठरविले. आईबाप आणि भावंडे परगावी गेली तरी नबूने त्यांच्याबरोबर जाण्याचा हट्ट धरला नाही.

काकू आणि काका सकाळी लवकरच उठत. काका आवडत्या व्यायाम-शाळेवर देखरेख करण्यासाठी तिकडे निघून जात, तर काकू गृहकृत्ये करण्यास लागत. चांगले उजाडल्यावर कुत्र्याला त्या हुकुम देत,' वाघ्या, 'ताईला उठव.' लगेच कुत्रा नबूच्या उशाशी जाऊन मोठयाने भुंकून तिला जागी करीत असे. त्यानंतर एका बाजूस वाघ्या आणि दुसऱ्या बाजूस मावशी (मांजरी)याच्यासह नबूचे दुग्धपान बादशाही थाटात होत असे.

दुग्धपान पुरे होत आहे तोच तिच्यासाठी ठेवलेल्या खास शिक्षिका कुमारी चंपावती चाफेकर (किंडर गार्डन, मॉंटेसरी आणि कांदिवली डिप्लोमा; साहित्यविशारदः कौमुदी) ह्या बिऱ्हाडी येऊन दाखल होत असत. त्यांच्याबरोबर नबूताई फिरावयास जात. चौपाटीवरील बागेत सृष्टिज्ञान व गाणी यांची ओळख त्यांस करून देण्यात येई. दुपारी जेवण होताच शिशुविहारसंस्थेत ती खेळावयास जाई. संध्याकाळी काका आणि काकू यांच्या बरोबर फिरणे किंवा सिनेमा पाहणे अशा प्रकाराच्या तिचा अगदी राजेशाही कार्यक्रम असे. काका त्या नातीवर फारसे भाळले नव्हते. पण काकुंना मात्र ते आपला जीव का प्राण आहेत आणि आईपेक्षा ही आपल्यावर तिचे अधिक प्रेम आहे असे वाटत असे. घडी घडी त्या तिला विचारत ताई मी चांगली की आई चांगली?''

जरा विचार करून नबू म्हणे, आई काही वाईट नाही पण काकू आजी तिच्याहून तू चांगली आहेस या गोड उत्तराने खाऊच्या रूपाने त्या पोरीला ताबडतोब बक्षीस मिळे. काका उपेक्षायुक्त दृष्टीने हा प्रकार पाहून म्हणत, अहो खाऊ पुरतं हे पोरीच बोलणे आहे. मातीचे कान चिकटवल्याने कायमचे का होणार आहेत ? यावर मानेला जोराचा हिसका मारून काकू आपली नापसंती व्यक्त करीत.

NOT TO BE REPUBLISHED

पाच सहा महिने गेले. सिकंदराबादेस रेवाचे डोळे बिघडल्यामुळे रेवा मुंबईस डोळे तपासून घेण्यास येणार होती. आता तिचे बिऱ्हाड मुंबईस असल्याने काका - काकुकडेच ती उतरणार होती, आई येणार कळल्यापासून नबुची कळी चांगलीच उमलली. आईचा वियोग प्रथम काही दिवस तिला जाणवला नाही. हॉनियल कुत्रे, इराणी मांजर, खास शिक्षिका, गोळ्या-बिस्कीटे आणि हिंडणे-फिरणे या नवीन गोष्टी होत्या, तिथपर्यंत तिला त्यांची गंमत वाटत होती. परंतु दोन-तीन महिन्यांनी त्या सर्व गोष्टी अंगवळणी पडून तिला त्यांचे महत्त्व वाटेनासे झाले. भावंडांची आणि आईची आठवण आता तिला ठळकपणे होऊ लागली.

रात्री-अपरात्री जर ती जागी झाली, तर डोळे मिटलेल्या स्थितीत ती 'आई' अशीच हाक मारी. 'काकू-आजी, मला पाणी' असे न म्हणता 'आई, मला पाणी' असेच ती म्हणत असे. काका आणि काकू ही दोघे आपल्या चैनी पुरवणारी माणसे आहेत असे ती समजत असे. त्या दोघांबद्दल तिच्या मनात कृतज्ञता वास करीत असे. अर्थात तिला त्या भावनेचे नाव माहीत नव्हते. पण तिचा जीव आई आणि भावंडे यांच्यासाठी तळमळत असे. आई येणार असे कळताच आनंदाच्या भरात तिने इतकी उंच उडी मारली की काकूंच्या मनात मत्सराची ठिणगीच उत्पन्न झाली. 'कारटीचं मी इतकं करते पण मला पाहून हिला हयाच्या शंभराव्वा हिस्सा तरी आनंद झाला आहे का कधी ? त्या मनात म्हणाल्या.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

आईला आणण्याकरिता बोरीबंदरवर सकाळी मद्रास मेलच्या वेळी जाण्याचे ठरले होते. रोज सकाळी नऊ वाजेपर्यंत निजून राहणारी ती मुलगी अंधारातच जागी झाली आणि तिने काका काकूस पहाटेच स्टेशनवर जावयास लाविले. ठरल्याप्रमाणे मद्रास मेलने आई आली. नबु तिच्या जवळून बिलकुल हालेना. एकसारखी तिच्या पाठीशी लागली होती. सकाळी दहाचा सुमार होता. रेवा आरशासमोर बसून स्वतः चे केस विंचरीत होती. काकू जवळच खुर्चीवर बसून तिला सिकंदराबादची हकीकत विचारीत होत्या. दुसऱ्या एका खुर्चीवर बसुन काका मधून- मधून वर्तमानपत्र वाचीत होते आणि मध्येच त्या दोघांच्या गप्पांत -तोंड घालीत होते. नबूने एक जस्ताची डबी आणली आणि रेवाजवळ उभी राहून डबी उघडीत ती म्हणाली, ''आई, तुला खडीसाखर हवी आहे का ग?''

‘‘मला नको, तूच खा म्हणजे माझं पोट भरेल.’’ रेवा म्हणाली.

‘‘नाही, तूच खा, म्हणजे माझं पोट भरेल’’

असे म्हणून नबूने डबितील एक खडा काढून आईच्या घशात कोंबला. नंतर गोड लागती आहे का नाही ? असे म्हणत, आईचे तोंड उघडून आणखी दोन खडे बळेच तिने त्यात घातले. रेवाने त्या खडीसाखरेपेक्षा गोड असणारा तिचा पापा घेतला. हे मातृकन्या प्रेमाचे मनोहर दृश्य काकांनी आपल्या नेहमीच्या उपेक्षायुक्त उपनेत्रांतून पाहिले व स्मित केले. पण काकू मात्र हे दृश्य पाहता पाहता अतिशय गंभीर होत गेल्या.

‘‘नबू, अन् मला ग?’’ त्यांनी म्हटले.

राहिलेले तीन खडे स्वतःच्या तोंडात टाकून हसत हसत रिकामी डबी खडबड वाजवीत नबु म्हणाली, खलास !

काकूंच्या क्रोधभावनेचा उद्रेक अवर्णनीय होता. कारटे आईच्या घशात ती नको म्हणत असताना खडीसाखर बळेबळे कोंबलीस अन् मी आर्जवानं मागत असताना मला एक कण देखील दिला नाहीस ! हे म्हणत होते, मातीचे कान चिकटवून चिकटत नसतात तेच खरं ! माझे डोळे आता चांगलेच उघडले. कलम केलेली माया उपयोगाची नसते. देवानं सत्तेचं दिलं नाही म्हणून उसन घ्यायला गेले, ही माझी चूकच झाली. रेवा, तू परत जाशील तेव्हा आपल्या मुलीला घेऊन जा. आम्ही दोघं राहू एकटीच आतापर्यंत राहिलो तशी!

दोन-तीन दिवसांनी इंग्रजी दैनिकात खालील जाहिरात विक्रीसाठी ह्या सदराखाली झळकली. विकणे आहे, एक कॉकर स्पॅनिअल कुत्रा आणि एक इराणी केसाळ मांजरी, त्याचप्रमाणे मुलांची लोखंडी कॉट, खालील पत्यावर तपास करा, काका शांतारामाची चाळ, मुंबई.

****

© KTBS NOT TO BE REPUBLISHED